# झाशीची राणी लक्ष्मीबाई

अशोक बेंडखळे



Scanned with CamScanner

# आभार

# झाशीची राणी लक्ष्मीबाई

या पुस्तकाचे सर्व हक्क **लेखक श्री. अशोक बेंडखळे** यांचेकडे आहेत.

"झाशीची राणी लक्ष्मीबाई" ची ही ई आवृत्ती आहे. ई साहित्यावर विनामूल्य करण्यात आली आहे. छापील प्रत लेखकांकडून विकत मिळू शकेल.

हे पुस्तक ई साहित्यवर विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही श्री. अशोक बेंडखळे यांचे मन:पुर्वक आभार मानतो. या पुस्तकाच्या विनामूल्य ई वितरणाच्या परवानगीबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान. ग्रंथाली, मुंबई यांचे मन:पूर्वक आभार मानते.

वाचकांनी वाचून झाल्यावर हे पुस्तक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोह्चवावे **(Forward and viral)** अशी विनंती आम्ही सर्व वाचकांना करतो.

Scanned with CamScanner

पुस्तकावरील आपले अभिप्राय

**श्री. अशोक बेंडखळे** यांना **9869258585**

या क्रमांकावर कळवावे.


ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237


विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी नाव आणि गाव

Whatsapp करा

Scanned with CamScanner

User2:\E:\Anirudha\2022 Books\Ashok Bendakhale\Lakshmi Rani\First Pages.pmd

# झांशीची राणी लक्ष्मीबाई

अशोक बेंडखळे

ग्रंथाली

Scanned with CamScanner

ग्रंथाली प्रकाशन क्रमांक ११८४

ISBN No. 978-93-5795-00 ????

**झांशीची राणी लक्ष्मीबाई**
अशोक बेंडखळे

पहिली आवृत्ती : २५ नोव्हेंबर २०२२

अशोक बेंडखळे
२/३०९ 'डी', विमान दर्शन, सहार रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९.
**भ्रमणध्वनी :** ९८६९२५८५८५
ashok.bendkhale@gmail.com

प्रकाशन
ग्रंथाली
१०१, १/बी विंग 'द नेस्ट',
पिंपळेश्वर को-ऑप. सोसायटी,
टायकलवाडी, स्टार सिटीसमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : (०२२) २४२१६०५०
granthalibooks@gmail.com

मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे : प्रमोद जोशी

अक्षरजुळणी : ग्रंथाली संगणक विभाग

मुद्रण
इंडिया प्रिंटिंग वर्क्स,
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई ४०० ०३१

**मूल्य १०० रुपये**

Scanned with CamScanner

छोटा नातू अर्जुन यास–
दुबईत राहून मराठी शिकण्याची तुझी धडपड कौतुकास्पद

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# मनोगत

छोट्या मुलांसाठी इतिहासातील पराक्रमी स्त्रियांची चरित्रे लिहायची हे माझ्या मनात खूप वर्षांपासून होते. सहा वर्षांपूर्वी राजा प्रकाशनाचे मुळे यांनी सुचवल्याप्रमाणे आधुनिक काळातील पाच स्त्रियांची चरित्रे लिहिली आणि 'महाराष्ट्राच्या पंचकन्या' या मालिकेअंतर्गत सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे आणि आनंदीबाई कर्वे या छोटेखानी पुस्तकांची निर्मिती झाली. डोक्यातला मूळ विचार गेला नव्हता. त्यातून राणी लक्ष्मीबाईंचे छोटे चरित्र लिहिले आणि 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर यांना भेटलो. ते तात्काळ म्हणाले, ''एक पुस्तक का? पाच पुस्तके करूया.'' अशाप्रकारे 'ऐतिहासिक पंचकन्या' अंतर्गत राजमाता जिजाई, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई होळकर आणि राणी लक्ष्मीबाई अशी पाच पुस्तके तयार झाली.

राणी लक्ष्मीबाईंचे झांशी संस्थान ब्रिटिशांनी खालसा केले. त्यानंतर अंगावर लष्करी गणवेष चढवून आणि हातात तलवार घेऊन लक्ष्मीबाईंनी पराक्रमाची शर्थ केली. मात्र नानासाहेब पेशव्यांच्या सैन्याकडून त्यांना हवी तशी साथ मिळाली नाही आणि त्यांना घोड्यावर स्वार होऊन संस्थानाबाहेर पडावे लागले. लक्ष्मीबाईंनी शेवटपर्यंत प्रयत्नांची शिकस्त केली आणि नाईलाज झाल्यावर धारातिर्थी देह ठेवला. मात्र आपल्या छोट्या मुलाला वाचवले आणि स्वतःचा देह इंग्रजांच्या हाती पडू दिला नाही. पराक्रमी राणीची ही शौर्यगाथा अद्वितीय आहे.

राणी लक्ष्मीबाईंचे हे छोटे चरित्र प्रसिद्ध होताना खूप आनंद होतो आहे. चित्रकार प्रमोद जोशी यांनी प्रसंगानुसार सुंदर रेखाचित्रे काढली आहेत, मुखपृष्ठही मोहक रेखाटले आहे. त्यांचे तसेच पुस्तक देखण्या रूपात प्रसिद्ध केल्याबद्दल 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर यांचे मनःपूर्वक आभार!

■ **अशोक बेंडखळे**



Scanned with CamScanner

# अनुक्रम


१. लक्ष्मीबाईंचं बालपण / १

२. झांशी संस्थान / ७

३. मनूचा विवाह / १०

४. पत्नी आणि मातृत्व / १४

५. पती निधन / १९

६. झांशी संस्थान खालसा / २२

७. १८५७चा स्वातंत्र्यसंग्राम / ३०

८. झांशीचा पाडाव / ३५

९. काल्पीची झुंज / ४५

१०. ग्वाल्हेरच्या लढाईत राणीचा अंत / ५०


Scanned with CamScanner

# १. लक्ष्मीबाईंचं बालपण

१८१८ मध्ये हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा ध्वज पुण्याच्या शनिवार वाड्याच्या तटावरून खाली खेचला गेला आणि इंग्रजांच्या कंपनी सरकारची राजवट निर्णायकपणे इथे सुरू झाली. त्यावेळी लॉर्ड डलहौसी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि साम्राज्यलोभी इंग्रज अधिकारी हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होता. त्याच्या दडपशाहीत तंजावर, औच्छी, जैतपूर, संबळपूर, बाधत, उदेपूर अशा कित्येक राज्यांची वारस नाही म्हणून आहुती पडली. त्यातच उत्तर हिंदुस्थानातील बुंदेलखंडाचा एक भाग असलेले झांशीचे संस्थान होते. या संस्थानाची राणी म्हणून पराक्रम गाजवलेली लक्ष्मीबाई हिची कहाणी मोठी स्फूर्तीदायक आणि अंगावर रोमांचं फुलवणारी आहे. ती वाचताना आजही स्वातंत्र्यप्रेमी माणसाच्या अंगावर स्फुरण चढते. दुसऱ्या बाजीरावाच्या राजाश्रयाखालील कुटुंबात वाढलेली एक मुलगी झांशीची राणी म्हणून अतुलनीय पराक्रम गाजवते त्याची कथा बालपणापासून पाहणे मनोरंजक आहे.

पेशवाईच्या काळात साताऱ्याजवळील वाई या गावात कृष्णराव



Scanned with CamScanner

तांबे ही बडी आसामी होती. कृष्णरावांचा मुलगा बळवंत पराक्रमी होता आणि त्याला पेशव्यांच्या सैन्यात मानाचं पद होतं. बळंवतरावांना दोन मुलं होती. मोरोपंत आणि सदाशिव. या दोघांवर पुण्याच्या दरबारात पेशव्यांची मर्जी होती. इंग्रजांनी पेशवाई बरखास्त केल्यावर दुसऱ्या बाजीरावाला ब्रह्मावर्तची जहागिरी देऊन तिकडे पाठवले तर चिमाजी अप्पा काशीला गेले. चिमाजी अप्पांबरोबर मोरोपंत तांबेसुद्धा काशीला गेले. त्यांची पत्नी भागीरथीबाईही त्यांच्याबरोबर होती. अस्सी घाटावरच्या एका वाड्यात मोरोपंत पत्नीसह राहत होते. त्याच घरात मोरोपंत–भागीरथीबाईंना मुलगी झाली (जन्मसाल अंदाजे १८२९ वा १८३०) मुलीचा जन्म काशीच्या गंगाकाठचा म्हणून मुलीचे नाव गंगेचेच म्हणजे मनकर्णिका असे ठेवण्यात आले. हीच मुलगी पुढे राणी लक्ष्मीबाई म्हणून प्रसिद्ध झाली आणि तिच्या पराक्रमाने हिंदुस्थानभर ख्यात झाली.

मनकर्णिकेचे घरात छोटे नामनिदान झाले आणि घरातील सगळे तिला मनू म्हणून हाक मारू लागले. चिमाजी अप्पांचा काशीला मृत्यू झाला आणि मोरोपंतांचा आश्रय तुटला. बाजीरावांची मोरोपंतांवर कृपादृष्टी होती. त्यांनी मोरोपंतांना बोलावून घेतले आणि मोरोपंत पत्नी आणि छोट्या मुलीला घेऊन ब्रह्मावर्तला आले. मनूची आई जास्त दिवस जगली नाही आणि तिचे संगोपन, तिचे लाड मोरोपंतांनी आईच्या मायेने केले. बाजीरावांना मूलबाळ नव्हते, त्यामुळे त्यांनी नानासाहेब आणि रावसाहेब अशी दोन मुले दत्तक घेतली होती. मनू अतिशय चुणचुणीत व देखणी होती. त्यामुळे बाजीराव व इतर सगळेजण या गोंडस मुलीला छबिली नावाने हाक मारत असत. मनू बाजीरावांची अतिशय लाडकी होती. त्यामुळे बाजीरावांच्या दोन दत्तक मुलांबरोबर बरोबरीने शिकण्याची संधी तिला मिळाली. ती बाळबोध आणि थोडी लिहायला, वाचायला शिकली. मल्लखांब, कुस्ती, तलवारबाजी,



Scanned with CamScanner



बंदूक चालवणे, घोडेस्वारी करणे असं सगळं ती बाजीरावांच्या मुलांबरोबर शिकली. विशेष म्हणजे तिचा चपळपणा, जिद्द, कणखरपणा लहानपणीच दिसून आला. त्यात तिला तीक्ष्ण बुद्धीचे वरदान होते.

बाजीरावांची दोन दत्तक मुले नानासाहेब आणि रावसाहेब अल्पसंतुष्ट होते मात्र मनूचे तसे नव्हते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आधुनिक पराक्रम आणि महाभारतकालिन अर्जुन, भीम यांची आख्याने कानावर पडल्यामुळे तिची मनोभूमिका जिद्दी बनली होती. बालपणी घडलेली दोन उदाहरणे तिच्या स्वभावावर प्रकाश टाकणारी आहेत.

एकदा ब्रह्मावर्ताच्या बाहेर तीन घोडेस्वार म्हणजे नानासाहेब, रावसाहेब आणि मनू यांची घौडदौड चालू होती. एका क्षणी नानाचा घोडा पुढे गेला. मनू स्वतःशी म्हणाली,

'आता बघतो तू कसा पुढे जातोस ते?'

तिनं घोड्याला वेग देऊन ती नानाच्या पुढे गेली. नानाने खूप प्रयत्न केला पण त्याला त्यात यश आले नाही. या प्रयत्नात एका



Scanned with CamScanner

क्षणी नानाच्या घोड्याचा पाय फसला आणि नानासाहेबांची स्वारी खाली पडली. दुर्दैवाने एका ओंडक्यावर त्याचे डोके आपटले आणि त्याच्या डोक्याला खोल जखम झाली. बरेच रक्त वाहू लागले. नाना घाबरला आणि त्याने मनूला हाक मारली. पुढे गेलेली मनू मागे आली. घोड्यावरून उतरून ती नानाजवळ गेली आणि त्याची जखम पाहिली. जखम खोल होती तरी न घाबरता, तिने नानाला धीर दिला आणि त्याला म्हणाली, 'तू घोड्यावर बैस, मी तुला घरी सोडेन.'

नानाला कळेना आपला घोडा पळून गेला असताना मनू आपल्याला घरी कशी नेणार? मनू मात्र बिनधास्त होती. तिनं एका हातानं आपल्या घोड्याचा लगाम पकडून त्याला घोड्यावर बसण्यास सांगितले आणि उडी मारून ती नानाच्या मागे बसली. एका हाताने तिने नानाला पकडले होते तर तिच्या दुसऱ्या हातात घोड्याचा लगाम होता. अशा स्थितीत तिनं सुखरूपपणे नानाला घरी आणलं. मनू आणि नाना दोघांच्या शरीराला रक्त लागले होते. ते पाहून मनूचे वडील मोरोपंत घाबरले. त्यांनी विचारले, 'अग मनू काय झालं? बरंच रक्त गेलेलं दिसतंय?' त्यावर मनू म्हणाली, 'काही नाही हो. छोटीसी बाब आहे. नानाच्या घोड्याला ठेच लागली आणि तो घोड्यावरून पडला. त्याला थोडी जखम झाली. एवढं काळजी करण्यासारखं काही नाही.' मोरोपंत आपल्या मुलीच्या स्वभावाचा धीटपणा पाहून मनोमन सुखावले मात्र चेहऱ्यावर नानाच्या जखमेचे दुःख होते. बाजीरावांना काय वाटेल याचे भय होते.

नानाच्या जखमेवर वैद्यांनी मलमपट्टी केली आणि त्यांची व बाजीरावांची काळजी मिटली.

दुसरा प्रसंग हत्तीवर बसण्याचा मनूनं केलेला हट्ट. नानासाहेब हत्तीवर बसून मोकळ्या हवेत फिरून आल्यास त्यांना बरं वाटेल म्हणून मोरोपंतांनी बाहेर हत्ती तयार ठेवला होता. नानासाहेब हत्तीवर बसून



Scanned with CamScanner

फिरावयास निघाले असता बालसुलभ स्वभावानुसार मनूनेसुद्धा नानाबरोबर हत्तीवर बसण्याचा हट्ट धरला. नानासाहेब मात्र तिला आपल्याबरोबर घ्यायला तयार नव्हता. हट्टी मनू रागावून बसली. या दोन्ही मुलांच्या हट्टाने मोरोपंत वैतागून गेले. मुलांमध्ये नानासाहेब मोठे होते परंतु ते पडले बाजीरावांचे चिरंजीव, त्यामुळे त्यांना काही सांगण्याचा मोरोपंतांना अधिकार नव्हता. त्यामुळे ते आपली मुलगी मनूवर रागावले आणि तिला म्हणाले, 'अगं, आपण राजे-महाराजे नाही, सामान्य माणसं आहोत. सोड हा हट्ट. आपल्या नशिबी हत्ती नाही.'

त्यावर मनूने पटकन् उत्तर दिले, 'माझ्या भाग्यात एक नाही, दोन नाही, दहा हत्ती आहेत.'

मनूच्या या बाणेदार उत्तराने मोरोपंतांचा राग पळाला आणि ते हसत म्हणाले, 'अग, काहीतरी वाचत बस तोपर्यंत नानासाहेब परत येतील.'

यावर मनू तणतणत म्हणाली, 'मी काही वाचत बिचत नाही. त्यापेक्षा नेमबाजीचा सराव करते.'

योगायोग म्हणजे पुढे मनूचा झांशी संस्थानच्या गंगाधरपंतांशी विवाह झाल्यावर त्यांनी तिला लग्नाचा आहेर म्हणून जी संपत्ती दिली त्यामध्ये दहा हत्ती होते. अशाप्रकारे मनूची बालपणीची इच्छा पूर्ण झाली.

'माझा प्रवास' मध्ये गोडसे भटजींनी मनूचे वर्णन केले आहे ते असे- 'मुलगी ही फार हुशार, निर्मळ, शहाणी गौरवर्णाची, अंगानी कृष व उफाड्याची. उंचीची उभारणी चांगली आहे. नाक सरळ, कपाळ उंच व डोळे कमलपात्राप्रमाणे वाटोळे असून मोठमोठे व कान मुखाला शोभा देणारे असे असून मध्यभाग कंबर शरीराचे झोकाप्रमाणे बारीक होती.'



Scanned with CamScanner

अशा मनूचे वय वाढत होते. त्या काळाप्रमाणे मुलींची लग्ने ८ ते १० वर्षांपर्यंत होत असत. तीच रीत होती. कारण वयात येण्या अगोदर मुलीचा विवाह जमला नाही तर मुलीच्या बापाला ते वाईट ही समजूत समाजात दृढ होती. त्यामुळे मनूचे वाढत असलेले वय याची मोरोपंतांना मुलीचा बाप म्हणून चिंता होती. अशात एका गृहस्थांना भेटण्याचा योग आला.

तात्या दीक्षित झांशी संस्थानामधून बाजीरावांना भेटायला आले होते. त्यांना ज्योतिषशास्त्र आणि मंत्र-तंत्र चांगले अवगत होते. मोरोपंतांनी तात्यांजवळ मनूविषयी बोलण्याची संधी साधली. त्यांना म्हणाले, 'तात्या मला माझ्या मनूच्या लग्नाची मोठी चिंता सतावत आहे. अनेकांना पत्रिका दाखवली पण विवाहमुहूर्त काही जुळून येत नाही. तुमची अनेकांची ओळख आहे. तुम्ही माझ्या मुलीला चांगला वर शोधून द्या. तात्यांना मनूबद्दल सांगताना ते म्हणाले, 'ती सगळी शस्त्र चालवण्यात पारंगत आहे. घोडेस्वारीमध्ये तर पुरुषांना मागे टाकते. लहानपणी तिची आई गेली आणि मीच तिचे लालनपालन केले. ती मराठी, हिंदी, संस्कृत शिकलीय आणि शास्त्र-पुराणंही तिला ज्ञात आहेत.'

बाजीरावांसाठी मनू छकुली होती, त्यांची आवडती होती. दुजोरा देताना ते तात्यांना म्हणाले, 'मनू सुंदर आहे, बुद्धिमान आहे. तिच्यासाठी चांगला वर नक्की शोधा.'

तात्यांनी मनूची पत्रिका मागितली. मोरोपंतांनी त्यांच्याकडे ती लगेच दिली. पत्रिका पाहून तात्यांनी डोळे विस्फारले. ते म्हणाले, 'या मुलीला राजयोग आहे. मुलीच्या भाग्यात राणीपद लिहून ठेवलंय.'

मोरोपंत आणि बाजीराव दोघांना खूप आनंद झाला. मोरोपंत म्हणाले, 'ही पत्रिका तुम्ही घेऊन जा. योग्य वर आढळला की लगेच सांगावा धाडा.'

■



Scanned with CamScanner

# २. झांशी संस्थान

सत्तावन्नच्या स्वातंत्र्यसंग्रामात चमकलेली झांशी नगरी प्रथम झांशीच्या परगण्याची राजधानी होती. झांशीचा हा परगणा उत्तर हिंदुस्थानातील बुंदेलखंडाचा एक भाग होता. १५३१ मध्ये या प्रदेशात बुंदेले राजाचं शासन होतं आणि म्हणून या प्रदेशाला नाव पडलं बुंदेलखंड. १७०७ मध्ये मोगल बादशहा बहादुरशहाकडून राजा छत्रसाल यास बुंदेलखंड जहागीर म्हणून मिळाला आणि या जहागिरीच्या बळावर छत्रसालाने साऱ्या बुंदेलखंडावर आपली सत्ता प्रस्थापित केली.

मोगलांनी छत्रसालास त्रास देण्यास सुरुवात केली, तेव्हा त्याने पहिले बाजीराव पेशवे यांना मदतीची हाक दिली. बाजीराव पेशव्यांनी तात्काळ बुंदेलखंडाकडे धाव घेतली आणि मोगलांचा सरदार महंमद बंगष याला १७२९ मध्ये घनघोर लढाईत संपूर्णपणे पराभूत केले. राजा छत्रसालाने बाजीरावावर खूष होऊन आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा दिला आणि मस्तानी ही आपली अनौरस मुलगीसुद्धा दिली. या हिश्शाचे उत्पन्न दोन लक्षावर होते. त्यातच झांशी, बांदा आणि सागर हे तीन सुभे होते. झांशीच्या सुभ्यावर बाजीरावांनी नारो शंकर मोतीवाले यास नेमले. मात्र तीन-चार वर्षांत तिथल्या गोसाव्यांच्या



Scanned with CamScanner

बंडानी त्रासून ते दक्षिणेस परतले. तेव्हा पेशव्यांनी आपले दुसरे सुभेदार रघुनाथराव हरि नेवाळकर यांना झांशीचे सुभेदार नेमले. रघुनाथराव करारी आणि पराक्रमी होते. त्यांनी बरोबर आपले बंधू शिवरामभाऊ यांना घेतले होते.

१७७० पासून १७९५ पर्यंत पंचवीस वर्षे रघुनाथरावांनी झांशीचे राज्य व्यवस्थित सांभाळले. शेवटी त्यांनी वानप्रस्थाश्रम स्वीकारून काशीस प्रयाण केले. जाण्यापूर्वी बंधू शिवरामभाऊ यांना गादीवर बसवले. १७९६ पासून १८१४ पर्यंत अठरा वर्षे राज्यकारभार सांभाळल्यावर शिवरामभाऊसुद्धा थकले आणि त्यांनी आपले नातू रामचंद्रराव यास सुभेदारीपदी बसवले. रामचंद्ररावांनी तब्बल एकवीस वर्षे राज्य केले. १८३५ मध्ये रामचंद्रराव पुत्रसंतान न होताच मृत्यू पावले. त्यांचे चुलते रघुनाथराव हे गादीवर आले पण त्यांच्या राज्यात बजबजपुरी माजली. तेव्हा त्यांना पदच्युत करून १८३७ मध्ये कंपनी सरकारने झांशीचा राज्य कारभार आपल्या हातात घेतला. रघुनाथरावांच्या मृत्यूनंतर (१८३८) दुसरा वारस नियुक्त करण्यासाठी कंपनी सरकारने कमिशन नेमले आणि त्यांच्या निर्णयाप्रमाणे शिवरामभाऊंचे तिसरे पुत्र गंगाधरराव यांस वारस ठरवून गादीवर बसवले.

रघुनाथरावांच्या राजवटीत झांशीवर फार कर्ज झाले होते. ते फिटेपर्यंत झांशीची व्यवस्था एका इंग्रज पर्यवेक्षकाकडे देण्यात आली. पाच वर्षांत संस्थान ऋणमुक्त झाले. १८४२ मध्ये कंपनी सरकारने गंगाधररावांच्या हाती राज्यसूत्रे सोपवली. त्यांच्या राज्यारोहण प्रसंगी इंग्रजी अधिकाऱ्याने मोठा समारंभ झांशी इथे घडवून आणला. गंगाधरराव हे करारी व कर्तृत्ववान राजपुरुष होते. त्यांनी मुख्य दिवाणपदावर राघो रामचंद्र नावाच्या हुषार प्रधानाची नेमणूक केली. प्रजेवरील कराच्या आकारणीची पाहणी केली आणि ती सुसह्य केली. कंपनी सरकारच्या तसेच आपल्या प्रदेशाची स्पष्ट आखणी करून घेतली आणि झांशीचा



Scanned with CamScanner

कोषागार संपन्न केला.

राज्याची सूत्रे हाती घेतल्यावर गंगाधररावांनी राज्यकारभार अत्यंत कुशलतेने हाकला. वक्तशीरपणाविषयी गंगाधररावांची ख्याती होती. कामात विलंब त्यांना खपत नसे. न्यायदानाचे काम ते निःपक्षपातीपणे करीत. त्यांचा स्वभाव करडा, त्यामुळे जनतेला आणि इंग्रजांना त्यांचा धाक वाटे. एकदा तर गॉर्डनसाहेबांशी बोलताना, 'आमच्या देशातील राज रजवाडे हे भागुबाई बनले आहेत, म्हणूनच तुम्ही लांबच्या देशातून येऊन आम्हाला नामोहरम केले आहे' अशा आशयाचे सूचक बोल सुनावण्यास ते कचरले नाहीत.

गंगाधररावांना हत्ती आणि घोडे यांचा अतिशय शौक होता तसेच नाटकांची आवड होती. बावीस नामांकित हत्ती आणि कित्येक उत्तम घोडे त्यांच्या पदरी होते. त्यांचा परिवार आणि सैन्य मोठे होते. पाचशे स्वारांचे अश्वदल, उत्तम असे शंभरावर घोडे आणि वरिष्ठ प्रतीचे चार तोफखाने त्यांनी राज्याच्या संरक्षणासाठी सज्ज ठेवले होते.

गंगाधररावांच्या राजवटीखाली झांशी संस्थानचे वैभव वाढू लागले. नारो शंकर याने झांशीचा किल्ला घेतल्यावर नवीन झांशी नगरी त्याला लागूनच वसवली. ओच्छी संस्थानातून आणि दक्षिणेतून बरीच कुटुंबे या नव्या नगरीत राहण्यास आली. माळवा आणि दिल्ली यांच्या राजमार्गावरील ही नगरी थोड्याच दिवसांत फार भरभराटीस आली. एका प्रमुख शहराचे आणि सैनिकी ठाण्याचे महत्त्व तिला प्राप्त झाले.

इंग्रज सरकारशी, इंग्रज अधिकाऱ्यांशी मैत्रीचे संबंध जपत असतानाच आपली स्वायत्तताही गंगाधररावांनी जपली. अशा सुंदर राजधानीत उत्कर्षाने राज्य करीत असतानाच गंगाधररावांची आवडती पत्नी रमाबाई मृत्यू पावल्या आणि झांशीच्या राणीपदावर येण्याचा एका शूर स्त्रीचा मार्ग मोकळा झाला.

■



Scanned with CamScanner

# ३. मनूचा विवाह

तात्या दीक्षित ब्रह्मावर्तहून झांशीला परतले. मनूची पत्रिका घेऊन ते आले होते आणि मनूसाठी चांगला नवरा शोधतो असं वचन त्यांनी मनूचे वडील मोरोपंत आणि साक्षात बाजीराव यांना दिले होते. तिचे लग्न आपण जमवले तर पेशव्यांकडून आपल्याला घसघशीत रक्कम मिळेल याची त्यांना खात्री होती.

स्वतःच्या फायद्याची बाब लक्षात येताच तात्यांनी मनूसाठी वरसंशोधन सुरू केले. सरदार घराण्यातल्या काही ब्राह्मणांच्या पत्रिका त्यांनी मनूच्या पत्रिकेशी जुळवून पाहिल्या. मात्र एकही जुळली नाही. विचार करता करता एका क्षणी झांशी संस्थानचे सुभेदार गंगाधरराव यांचे नाव त्यांच्यासमोर आले आणि त्यातील दोन-तीन अडचणीसुद्धा ध्यानात आल्या. गंगाधररावांच्या पहिल्या पत्नीचं निधन होऊन खूप काळ लोटला होता. दुसरे म्हणजे मोरोपंत एक क्षुल्लक आश्रीत तेव्हा त्यांच्या मुलीसाठी श्रीमंताचे ठिकाण कसे जुळून यावे, त्याबरोबर कडक शिस्तीतल्या गंगाधररावांना कसे विचारावे हाही प्रश्न होता. हे लग्न जुळून आल्यास आपला तिहेरी फायदा होईल हेही त्यांना दिसत



Scanned with CamScanner



होते. मनूचे वडील मोरोपंत आपल्या ऋणात राहतील, बाजीरावांपुढे आपली मान उंचावेल आणि झांशी मध्ये आपला दबदबा पसरेल हा विचार त्यांना सुखावत होता.

मनू दिसायला सुंदर आहे, राणीपदाला अगदी योग्य आहे आणि गंगाधरराव तिला पसंत करतील याची त्यांना खात्री होती. मात्र दोघांच्या वयातलं अंतर हा अडसर होता. मनू तेरा-चौदा वर्षांची तर गंगाधरराव चाळीशी पार केलेले. त्यांची प्रकृती ठणठणीत होती. या सगळ्या बाबींचा विचार करून एक दिवस त्यांनी गंगाधररावांना विचारण्याचा निर्णय घेतला.

महाराज निवांत बसले आहेत याचा फायदा घेऊन त्यांनी विचारले,

'महाराज, राणीसाहेब जाऊन बराच काळ लोटला.'

'मग मी काय करावं असं वाटतं? एकही पत्रिका नीट जमत नाही तात्या.'

'महाराज, माफ करा एक मुलगी माझ्या पाहण्यात आहे आणि तिची पत्रिकाही नीट जमली आहे. मुलगी सुंदर आणि तेज बुद्धीची



Scanned with CamScanner

आहे. घोडेस्वारी, तलवारबाजीत कुशाग्र आहे.'

'कुठे आहे अशी मुलगी?' महाराज हसत म्हणाले.

'ब्रह्मावर्तच्या श्रीमंत बाजीराव पेशव्यांच्या पदरी मोरोपंत तांबे नावाचे गृहस्थ आहेत. त्यांची मनू नावाची ही मुलगी. पेशव्यांनी तिला आपली मुलगी मानले आहे.'

'परंतु बाजीरावांना हे पसंत पडेल का?' महाराजांचा प्रश्न.

'ते तुम्ही माझ्यावर सोपवा.' तात्या उत्तरले.

या उत्तराने गंगाधरराव शाश्वत झाले आणि त्यांनी साखरपुड्यासाठी परवानगी दिली.

तात्या दीक्षित इतर सेवकांबरोबर ब्रह्मावर्तला गेले आणि त्यांनी ही सुवार्ता मोरोपंत आणि बाजीराव यांच्या कानावर घातली. बाजीराव पेशवे खूश झाले. त्यांनी मनूला रंगीत रेशमी साडी, सोन्याची आभूषणे, माणिक, मोत्यांचे हार असे दागिने दिले. हे दागिने परिधान करून मनू नटली आणि साखरपुड्याचा सोहळा पार पडला.

मनूचे मित्र नानासाहेब आणि रावसाहेब यांच्या गप्पांमध्ये नानासाहेब तिला म्हणाले, 'मनू तुझं हत्तीवर बसून ब्रह्मावर्तला येण्याचं स्वप्न पूर्ण झालं.'

गंगाधरराव आणि मनूच्या विवाहची बोलणीसुद्धा लगेच पार पडली.

विवाह समारंभ झांशीत होईल आणि सर्व खर्च गंगाधरराव करतील तसेच मोरोपंतांनी लग्नानंतर झांशीत रहावे आणि त्यांना झांशीचे सरदार केले जाईल असे बैठकीत ठरले.

विवाहाचा मुहूर्त नक्की करून झांशीची मंडळी परत गेली.

बाजीरावांना मोरोपंतांची काळजी होती. झांशीमध्ये त्यांची चांगली व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी बाळा गुरूच्या आखाडातल्या तात्या नावाच्या तरुणाला झांशीला पाठवले (पुढे हाच तात्या इतिहासात



Scanned with CamScanner

तात्या टोपे म्हणून प्रसिद्ध झाला.)

बैठकीत नक्की झाल्याप्रमाणे मोरोपंत मनूला घेऊन झांशीला आले. त्यांच्या सोबत तात्या टोपेसुद्धा होता. १८४२च्या मे महिन्यात हा विवाह सोहळा पार पडला. तिथल्या गणेश मंदिरात सीमान्तपूजन, वटपूजन हे विधी झाले. गंगाधरराव घोड्यावर बसून मंदिरात पोचले होते. मनूने त्यांना प्रथमच पाहिले. त्यांचे वय वाढलेले होते मात्र शरीर बलदंड होते. त्यांची घोड्यावर बसण्याची ऐट मनूला सुखावून गेली होती.

अचानक मनूसमोर सुंदर, मुंदर आणि काशी नावाच्या तीन मुली आल्या. आम्ही तुमच्या सेवेसाठी दासी आहोत, असं त्या म्हणाल्या. त्यावर मनू त्यांना म्हणाली, 'तुम्ही माझ्या दासी वगैरे नाही तर माझ्या सख्या आहात. आणि तोच मान मी तुम्हाला यापुढे देणार आहे.'

आपल्या होणाऱ्या राणीच्या या उद्‌गारांनी त्या मुलींना खूप बरे वाटले.

गणेश मंदिरात वाद्ये वाजत होती, सनईत सूर हेलावत होते आणि या गोड स्वरांनी एक उत्तम वातावरण निर्मिती होत होती. विवाहासाठी आसपासचे राजे मुद्दाम उपस्थित होते. थोड्या वेळाने सप्तपदी पार पडली, इतरही विधी झाले आणि वरवेषातील गंगाधरराव बाहेर आले. जमलेल्या सर्वांनी त्यांना मानवंदना दिली.

विवाहानंतर मनूचं नाव बदलण्यात आलं आणि ती लक्ष्मीबाई झाली.

■

# ४. पत्नी आणि मातृत्व

विवाहानंतर स्त्रिया माहेरी आल्यानंतर त्यांना आपल्या स्वभावाला मुरड घालावी लागते. बोलघेवडी, चळवळी मनूचं लग्नानंतर शांत, गंभीर व अबोल अशा लक्ष्मीबाईत रूपांतर घडलं होतं. शीघ्र कोपी स्वभावसुद्धा तिनं आटोक्यात आणला होता. किल्ल्याच्या महालात ती राहत होती, कुठे बाहेर जायची सोय नव्हती. किल्ल्याच्या आसपासच्या मोकळ्या जागेत तिचं फिरणं, व्यायाम करणं चालू होतं. आपल्या मैत्रिणींना आणि किल्ल्यात राहणाऱ्या इतर स्त्रियांना घोड्यावर बसणं, शस्त्र चालवणं, मल्लखांब आणि कुस्ती शिकवण्यात तिचा बराचसा वेळ जात होता. धर्मग्रंथांचं वाचन ती नित्यनियमानं करीत असायची आणि भगवद्‌गीता पठन हा तर तिचा अतीव श्रद्धेचा भाग होता. अशा अनेकविध कामात तिनं स्वतःला गुंतवून घेतलं होतं.

दिवस सरत होते तसे लक्ष्मीबाईला आपले पती गंगाधरराव यांच्या स्वभावाचा परिचय घडत गेला. त्यांना राग चटकन यायचा, स्वभावात कठोरपणा होता. त्यांनी गुन्हेगारांना दिलेल्या शिक्षा खूप कडक



Scanned with CamScanner

असायच्या. संतापाच्या भरात हातून फाशीच्या शिक्षा दिल्या जायच्या.

विवाहानंतर लगेच घडलेली एक घटना. लक्ष्मीबाई गंगाधररावांबरोबर शंकराच्या दर्शनासाठी मंदिराकडे निघाली होती. मंदिर जवळ असल्यामुळे पायीच निघाले होते. मंदिराच्या मार्गावर तुरूंग होता. तिथून गुन्हेगारांच्या किंकाळ्या कानावर पडल्या, फाशीसाठी लागणारे दोरखंड, कड्या यांचेही दर्शन घडले होते.

लक्ष्मीबाईचं हळवं मन हे सगळं पाहून खूप अस्वस्थ झालं. ती गंगाधररावांना म्हणाली, 'देवदर्शनाच्या मार्गावर हा तुरूंग आहे. गुन्हेगारांच्या किंकाळ्या, आरडओरड अगदी नको वाटते अशा वेळी.' गंगाधररावांना तिचं म्हणणं पटलं आणि तिला ते म्हणाले, 'तुमची इच्छा रास्त आहे, पटली आम्हाला. यापुढे कोणाला फाशी दिली जाणार नाही.'

झांशीच्या राजानं राणीला दिलेलं वचन पाळलं. लक्ष्मीबाईमुळं फाशीची शिक्षा रद्द झाली हे जनतेला कळलं. या घटनेमुळे झांशीची समस्त जनता नव्या राणीवर प्रेम करू लागली.

१८५० मध्ये गंगाधरराव आपली पत्नी लक्ष्मीबाईला घेऊन तीर्थयात्रेला निघाले. त्यांनी प्रयाग, काशी, गया अशा पवित्र स्थळांना भेटी दिल्या. काशी हे तर लक्ष्मीबाईचं जन्मस्थान. त्यामुळे जन्मगावाला भेट देण्याचा तिला अतीव आनंद झाला. राणी म्हणून काही बंधने असूनही स्वभावाप्रमाणे नवी गावे पाहण्याचा, प्रवास करण्याचा आनंद ती घेत होती.

तीर्थयात्रेला निघण्यापूर्वी एक चांगली गोष्ट घडली होती.

कंपनी सरकारने गंगाधररावांना राज्य कारभार करण्याचे अधिकार दिले, त्याचबरोबर अगोदर सरकारकडे जमा केलेले ३० लाख रुपये त्यांना परत करण्यात आले.

गंगाधररावांना दिखाव्याची हौस होती. त्यांनी लाडक्या हत्तीला



Scanned with CamScanner

सोन्याने मढवण्यासाठी काही रक्कम खर्च केली ते काही राणी लक्ष्मीबाईला आवडले नाही. या पैशातून त्यांनी एक चांगली गोष्टही केली आणि ती म्हणजे संस्थानासाठी पाच हजार सैन्य उभे केले. त्यात जवळपास दोन हजार गोलंदाज, पाचशे घोडेस्वार, पायदळाचे काही खास सैनिक आणि चार तोफा यांचा समावेश होता. ही बाब लक्ष्मीबाईंना आवडली.

गंगाधरराव पुराणमतवादी होते. महालात स्त्रियांनी पडद्याची बंधने पाळण्यावर ते आग्रही होते. तीर्थयात्रेहून परतल्यावर लक्ष्मीबाईंवरही बंधने टाकण्यात आली. महालाच्या मैदानात भोवती कनाती लावण्यात आल्या. राणीला घोडेस्वारी जरी करता आली नाही तरी मल्लखांब आणि कुस्तीची तयारी त्या जाड आणि मऊ गालिच्यांवर करीत होत्या.

महालामध्ये लक्ष्मीबाईंच्या येण्यामुळे गंगाधररावांचा नाटक-शाळेकडील ओढा कमी होत गेला. ते राज्य कारभारात लक्ष घालू लागले. ते कडक शिस्तीचे भोक्ते असल्यामुळे त्यांचे निर्णय मनमानी व अन्यायकारक असत. गंगाधररावांच्या कडक कारभारात कधी कणव, दया दिसू आली तर ती नव्या राणीच्या येण्यामुळे आली आहे हे प्रजेला कळू लागले होते आणि त्यांचा राणी लक्ष्मीबाईवरील विश्वास आणि प्रेम वाढू लागले होते.

गंगाधररावंना पहिल्या पत्नीपासून काही अपत्य प्राप्ती नव्हती. दुसरा विवाह त्यांनी आपल्याला अपत्य होईल आणि गादीला वारस मिळेल या सुप्त आशेखातर केला होता. राणी गर्भवती राहिली याचा त्यांना आनंद झाला. परंतु तिला मुलगा होईल याची खात्री नव्हती. वारस जन्माला येण्यापूर्वी गंगाधररावांचे निधन झाले तर इंग्रज सरकार झांशी संस्थान विलीन करण्यास मोकळे होते. इंग्रज अधिकारी हे जाणून होते, त्यामुळे गंगाधररावांचे रोखठोक आणि स्पष्ट बोलणे



Scanned with CamScanner

अधिकारी मुकाट्याने ऐकून घेत असत.

साल १८५१ मधील प्रारंभीची घटना. त्यावेळी नुकतेच दुसऱ्या बाजीरावांचं ब्रह्मवर्तला निधन झालं होतं. इंग्रज अधिकारी गॉर्डन याच्याशी गंगाधररावांचे चांगले संबंध होते. गॉर्डन एकदा त्यांना भेटायला आला. रोखठोक स्वभावाचे गंगाधरराव त्याला म्हणाले, 'तुम्ही बाजीरावांची पेन्शन रद्द केलीत हे बरोबर केले नाहीत.'

त्यावर गॉर्डन उत्तरला, '१८०२च्या कराराप्रमाणे फक्त बाजीरावाच्या कुटुंबाला पेन्शनचा अधिकार आहे हे तुम्हाला माहीत नाही का?'

'बाजीरावांचा एक दत्तक पुत्र आहे. तो कुटुंबात येत नाही का?' गंगाधरराव रागात म्हणाले.

'आमच्या देशात दत्तकाला मान्यता नाही.' गॉर्डनचे उत्तर.

या उत्तराने गंगाधररावांचे समाधान झाले नाही. मात्र गॉर्डनच्या बोलण्याने ते मनात काहीसे धास्तावले. कधीतरी आपल्याही संस्थानात ही वेळ येईल याची ती भीती होती.

हे बोलणे चालू असतानाच एक सेवक धावत त्या ठिकाणी आला आणि त्याने 'महाराज की जय हो' असे म्हणून कुर्निसात केला.

राणी लक्ष्मीबाई प्रसूतीगृहात असल्याचे त्यांना माहीत होते. त्यामुळे चांगल्या बातमीची त्यांना अपेक्षा होती. त्यांनी अधीरतेने विचारले, 'काय बातमी आहे?'

सेवक म्हणाला, 'महाराज, राणीने पुत्राला जन्म दिलाय.'

ही घटना होती १८५१च्या जानेवारीमधली.

राणी लक्ष्मीबाई यांना पुत्र झाला आणि गंगाधररावांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. झांशीमध्ये पुत्र जन्माचा मोठा उत्सव झाला. बराच दानधर्म केला गेला. गादीला औरस वारस मिळाला म्हणून



Scanned with CamScanner

अर्थातच गंगाधररावांना अत्यानंद झाला. ही बातमी गव्हर्नर जनरलकडे धाडण्यात आली. झांशी संस्थान गिळंकृत करण्याचा इंग्रजांचा डाव काही काळापुरता तरी टळला होता.

या बातमीने इंग्रज सरकार नाराज झाले, मात्र झांशीचे प्रजानन खूप आनंदात होते.

■



Scanned with CamScanner

# ५. पती निधन

राणी लक्ष्मीबाईंना झालेल्या पुत्रप्राप्तीचा आनंद झांशीतील सर्व प्रजाजनांना झाला. गंगाधररावसुद्धा खुशीत होते. परंतु पुत्र जन्माचा त्यांचा आनंद फार काळ टिकला नाही. मुलगा तीन महिन्यांचा असतानाच मृत्यूने त्यावर झडप घातली आणि संपूर्ण झांशी संस्थानावर दुःखाची छाया पसरली.

गंगाधररावांची प्रकृती तेव्हापासून खालावू लागली. ती पुन्हा कधीच उभारून आली नाही. दोन वर्षांच्या आत ती पूर्ण विकोपास गेली. ही दोन वर्षे लक्ष्मीबाई आणि गंगाधररावांनी अतिशय वाईट मनःस्थितीत घालवली. त्यांची कुलस्वामिनी होती देवी महालक्ष्मी. ऑक्टोबर १८५३ मध्ये झालेल्या नवरात्रीच्या देवीच्या महोत्सवात राजवैद्य नको म्हणत असताही त्यांनी भाग घेतला आणि पुढे विजया दशमीचा प्रतिवर्षीचा सीमोल्लंघन दरबार इत्यादी समारंभात ते शेवटपर्यंत उपस्थित राहिले. हे श्रम त्यांना पेलवले नाहीत आणि संग्रहमीच्या विकारानं ते अंथरूणाला खिळले. त्यांना बरे वाटावे यासाठी राजपत्नी म्हणून लक्ष्मीबाईंनी देवदेवतांची आराधना सुरू केली तर दुसरीकडे



Scanned with CamScanner



कुशल राजवैद्य औषधे देत होते. लक्ष्मीबाई महाराजांच्या खंगत चाललेल्या प्रकृतीने खूप चिंताग्रस्त झाल्या होत्या. सतत पतीजवळ बसून त्या त्यांची जमेल तेवढी सेवा करीत होत्या. पण या सर्व उपायांचा काही परिणाम झाला नाही. नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा सर्वांनी चिंतेत काढला. गंगाधररावांची प्रकृती अधिकच बिघडल्यावर दिवाण नरसिंहराव यांनी त्यांच्या पश्चात कायद्याच्या व्यवस्थेची बाब त्यांच्यापुढे मांडली. त्यावर गंगाधरराव म्हणाले,

'मी प्रकृतीविषयी अजून निराश झालेलो नाही. पण राज्यासाठी दत्तक घ्यावा अशी माझी इच्छा आहे. मला वाटते आमच्या घराण्यातील पणज्यांच्या वंशातले वासुदेव नेवाळकर यांचा मुलगा आनंदराव यास दत्तक घ्यावे.'

आनंद पाच वर्षांचा होता, तरी तो बुद्धीने तल्लख आणि हुशार होता. लक्ष्मीबाईंचेसुद्धा त्याच्यावर प्रेम होते. तेव्हा त्यालाच दत्तक घेण्याचे ठरले. राजदरबारातील प्रमुख व्यक्तींनी हा समारंभ २० नोव्हेंबर १८५३ला लगेचच घडवून आणला. गावातील प्रतिष्ठित आणि विद्वान



Scanned with CamScanner

मंडळी यांना समारंभाचे आमंत्रण देण्यात आले होते. तसेच बुंदेलखंडामधील ब्रिटिश अधिकाऱ्यांनाही पाचारण करण्यात आले होते. या सर्वांच्या उपस्थितीत गंगाधररावांनी आनंदला दत्तक घेतले आणि त्याचे नाव दामोदरराव असे बदलण्यात आले.

धर्मशास्त्रानुसार झालेल्या या दत्तक विधानाच्या समारंभानंतर नवीन पुत्र लाभ झाल्याच्या आनंदात गंगाधररावांनी एक खलिता २० नोव्हेंबर रोजीच इंग्रज सरकारला लिहिला, त्यातला मजकूर असा–

'तहातील कलमाप्रमाणे आनंदराव नावाच्या पाच वर्षांच्या मुलाला मी दत्तक घेतले आहे. त्याचे नाव बदलून दामोदरराव असे ठेवले आहे. हा मुलगा माझ्या वंशातला असून माझा नातू लागतो. देवदयेने मी दुखण्यातून अजूनही बरा होईन आणि मला संतती झाली तर योग्य ती व्यवस्था केली जाईलच. पण माझा मृत्यू घडला तर मात्र इंग्रज सरकारशी नेहमी ज्या प्रामाणिकपणे मी वागत आलो आहे, त्याकडे लक्ष देऊन या मुलावर सरकारकडून कृपादृष्टी केली जावी आणि त्याच्या अज्ञात वयात माझ्या मागे माझ्या पत्नीस राजपालक आणि संस्थानची स्वामिनी म्हणून मान्यता देण्यात यावी.'

गंगाधररावांनी हा खलिता मेजर एलिस याच्या हाती दिला आणि आपली इच्छा पूर्ण करण्यास त्यास सांगितले.

आपली इंग्रज सरकारशी असलेली विश्वासू वागणूक विसरली जाणार नाही, या भ्रमात राहून गंगाधररावांनी दुसऱ्याच दिवशी म्हणजे २१ नोव्हेंबर १८५३ला दुपारी इहलोकीची यात्रा संपवली.

राणी लक्ष्मीबाईंवर या आघाताने जणू आकाशाची कुऱ्हाड कोसळली.

■



Scanned with CamScanner

# ६. झांशी संस्थान खालसा

गंगाधररावांच्या स्मशानयात्रेला मेजर एलिस आणि कॅप्टन मार्टिन इतर युरोपियन अधिकाऱ्यांसह सुतकी चेहऱ्याने उपस्थित होते. अंत्यसंस्कारानंतर ते राणी लक्ष्मीबाईकडे सांत्वनासाठी गेले आणि आपल्या इच्छेप्रमाणे सर्व होईल असे आश्वासन दिले.

यानंतर मेजर एलिस याने पहिली गोष्ट केली ती म्हणजे झांशीच्या किल्ल्यात जो राज्यकोष होता, त्याला सर्वांच्या देखत मोहोर ठोकली आणि काही गडबड होऊ नये म्हणून तिथल्या संरक्षणासाठी शिंदेंच्या सेनेचे सहावे पथक ठेवले. संस्थानातही काही दगाफटका होऊ नये म्हणून सर्वत्र सैनिकी पहाराही बसवला. राजाच्या मृत्यूनंतर आजूबाजूचे ठाकूर, पेंढारी किंवा इतर कोणी झांशीवर हल्ला करतील ही भीती होती, त्यामुळे खबरदारीचा हा उपाय केला होता.

गंगाधररावांनी लिहिलेले पत्र मेजर माल्कमकडे ग्वाल्हेरला पोचते करण्यात आले. बुंदेलखंडाचा राजकीय प्रतिनिधी असलेल्या मेजर माल्कमने ताबडतोब गव्हर्नर जनरलला पत्र पाठवून सगळी हकीगत



Scanned with CamScanner

कळवली आणि त्या बाबतीतले आपले मतही कळवले. पत्रात त्यांनी लिहिले–

'गंगाधररावांना औरस मुलगा नाही. त्यांच्या मृत्यूच्या आदल्या दिवशी त्यांनी दत्तक मुलगा घेतला. हा मुलगा चुलत घराण्यातला आहे. झांशी संस्थान पूर्णपणाने इंग्रजांच्या हुकमतीखाली असल्यामुळे सरकारच्या परवानगी शिवाय गंगाधररावांना झांशीचा वारस म्हणून दत्तक घेता येत नाही. लक्ष्मीबाई ही अतिशय बुद्धिमान व प्रजाजनांमध्ये अत्यंत लोकप्रिय असल्यामुळे ती राज्य–कारभार उत्तमरितीने चालवू शकते. परंतु कंपनी सरकारच्या धोरणानुसार हे संस्थान खालसा केले जावे. मृत राजाची खाजगी मालमत्ता व झांशी शहरातील राजवाडा लक्ष्मीबाईला द्यावा. राणीला आपल्या इतमामास साजेसे राहता यावे यासाठी दरमहा पाच हजार पौंडाची पेन्शन देण्यात यावी.

या पत्राने झांशी संस्थान खालसा होणार हे निश्चित झाले.

दरबारातल्या लोकांना व खुद्द राणी लक्ष्मीबाईला विश्वास होता की कंपनी सरकारबरोबर झांशीकरांचे निकटचे मैत्रीसंबंध, त्यांनी सरकारला केलेली मदत व दाखवलेली निष्ठा आणि गंगाधररावांनी मृत्यूसमयी लिहिलेले पत्र हे लक्षात घेता दत्तकविधान मान्य केले जाईल. मात्र त्याचवेळेला आजूबाजूच्या घटना चांगल्या नव्हत्या. झांशीचा किल्ला, शहर इथे इंग्रजी फौजांच्या पलटणी रूजू झाल्या. त्यामुळे मनात शंकेची पाल चुकचुकत होती.

मेजर माल्कमचे पत्र कलकत्त्यास पोचले तेव्हा गव्हर्नर जनरल डलहौसी अयोध्या प्रांतात गेला होता. त्यामुळे चार–पाच महिने झाले तरी कलकत्त्याहून माल्कमला काहीच उत्तर मिळाले नाही.

गंगाधररावांच्या अंत्यविधीसाठी ब्रह्मावर्तहून लक्ष्मीबाईंचे सांत्वन करण्यासाठी नानासाहेब आपल्या दोन भावांसह आले होते. त्यांच्याबरोबर तात्या टोपेसुद्धा होते. निवांतपणे अशी त्यांची प्रथम



Scanned with CamScanner

भेट होत होती. सर्वांच्या मनात कालवाकालव होती. नानासाहेब त्यांची पेन्शन रद्द झाल्यामुळे संतप्त होते. तर लक्ष्मीबाई गंगाधररावांच्या अचानक निधनाने दुःखी होती. त्यात झांशीचे संस्थान इंग्रज खालसा करणार ही वदंता होती. शिल्लक राहिलेले एकच मराठी राज्यही नामशेष होण्याच्या मार्गावर होते. तसे वरवर झांशीमधले सगळे ठीक होते. कारभारही राणीच्या ताब्यात होता. त्याचवेळी इंग्रज सरकारचा कुटील डाव चालू होता. छावणीत सैन्य आणि तोफा पाठवण्याचे काम चालू होते. सगळ्या गोष्टी मनात भीती वाढवणाऱ्या होत्या.

बरेच दिवस लक्ष्मीबाईंनी झांशीच्या बाहेर पाऊल टाकले नव्हते. त्यामुळे बाहेर काय घडते आहे याची तिला माहिती नव्हती. तात्या टोपेंनी काही खबर दिली. दिल्लीचा वृद्ध बादशहा, ग्वाल्हेरचा कुमारवयातला राजा, हैद्राबादचा नबाब, पंजाब आणि बंगालमधील संस्थानिक सगळे आपापल्या राज्यात सुखात होते. मात्र स्वाभिमान विसरून ते प्रजेकडून मुजरा स्वीकारण्यात धन्यता मानून बसले होते.

राणी लक्ष्मीबाई हे ऐकून निराश झाली. किल्ल्यातील सैन्याच्या फलटणी पाहून आपले भविष्य तिने जाणले होते. ती त्यांना म्हणाली, ' आपले संस्थानसुद्धा लवकरच खालसा होणार.'

राणीचा हा सूर नानासाहेबांना आवडला नाही. ते म्हणाले, 'मनुताई झांशीवर आमची शेवटी मदार आहे. दामोदररावांना दत्तक म्हणून मान्यता मिळायला हवी.'

इंग्रजांचं स्वार्थी वागणं राणीला माहीत होतं. ती म्हणाली, 'मान्यता मिळाली नाही तर मी स्वतः गव्हर्नर जनरलला भेटेन आणि आमची बाजू मांडेन. आमचा करार मोडणं त्यांना जड जाईल.'

तात्या टोपेला इंग्रजांची स्वार्थीवृत्ती माहीत होती. तो म्हणाला, 'इंग्रज त्यांच्या स्वार्थासाठी काहीही करू शकतात.'

राणीचा आपल्या जनतेवर पूर्ण विश्वास होता. शिवाजी महाराजांनी



Scanned with CamScanner

आपल्या मावळ्यांच्या बळावरच दिल्लीच्या बादशहाला आव्हान दिले हे तिला माहीत होतं. ती म्हणाली, 'माझी प्रजा मी ओळखते. या प्रजेला खंबीर नेतृत्व हवे आहे.'

'पण गव्हर्नर जनरलने तुमच्या दत्तकाला मान्यता दिली नाही तर पुढे काय?' नानासाहेबांनी शंका उपस्थित केली.

राणी खंबीरपणे म्हणाली, 'नाही दिली तर मी त्यांना द्यायला लावीन कारण माझी प्रजा माझ्यामागे आहे.'

राणी लक्ष्मीबाईंच्या या उत्तराने नानासाहेब आणि तात्या टोपे या दोघांनाही राणी संधीची वाट पहाते आहे याची खात्री पटली.

गंगाधररावांच्या पत्राला उत्तर आले नाही, तेव्हा राणी लक्ष्मीबाईने गव्हर्नर जनरलला पहिले पत्र पाठवले ते ३ डिसेंबर १८५३ रोजी. या पत्रामधून तिने दत्तकपुत्र दामोदररावाच्या वारसा हक्काला मान्यता द्यावी अशी विनंती केली. झांशी संस्थान आणि कंपनी सरकार यांच्यामध्ये झालेल्या १८१७ आणि १८४२ सालच्या कराराची उजळणी करून दोन्ही सरकारांमधल्या मैत्रीची आठवण करून दिली.

आपल्या पत्राच्या उत्तराची वाट लक्ष्मीबाईंनी पाहिली, मात्र तिला उत्तर आले नाही म्हणून १६ फेब्रुवारी १८५४ रोजी दुसरा अर्ज पाठवला. या पत्रात करारपत्रानुसार (औरस, वंशपरंपरागत हक्कदार) बरोबर जानिस (वंशपरंपरागत हक्कदार नसता दत्तक घेतलेल्याचा हक्क) सुद्धा हक्कदार ठरतो म्हणून दामोदरराव या दत्तक घेतलेल्या मुलाचा कायदेशीर हक्क मान्य करण्यात यावा असे कळवले. परंतु या पत्राचाही काही उपयोग झाला नाही.

गव्हर्नर जनरल दौऱ्यावरून परत आला आणि झांशी प्रकरण त्याच्यापुढे आले. त्यांनी सगळं ऐकलं आणि २७ फेब्रुवारी १८५४ रोजी झांशी संस्थान खालसा करण्याचा निर्णय दिला.

झांशी संस्था खालसा करून ते इंग्रजी सरकारच्या राज्यात विलीन



Scanned with CamScanner

करण्यात आले आणि पोलिटिकल एजंटच्या शिफारशीनुसार राणीला मासिक पेन्शन दिले गेले.

मेजर माल्कमने १३ मार्च १८५४ रोजी झांशीच्या प्रजेला उद्देशून जाहीरनामा काढला, तो असा–

'झांशी संस्थान हिंदुस्थान सरकारच्या हुकूमानुसार ७ मार्च १८५४ रोजी ब्रिटिश सरकारात विलीन केले आहे. या जाहीरनाम्याद्वारे झांशी संस्थानच्या सर्व नागरिकांना कळविण्यात येत आहे की, झांशी संस्थान यापुढे बुंदेलखंडाचे एजंट मेजर एलिस यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तेव्हा सर्व नागरिकांनी स्वतःला ब्रिटिश सरकारचे नागरिक मानावे. वसूल मेजर एलिस यांना द्यावा आणि सुखसमाधानात राहावे.'

राणी लक्ष्मीबाई प्रमाणेच झांशीवासीयांना असे वाटत होते की, झांशी संस्थानाने इंग्रजी सरकारला वेळोवेळी केलेल्या मदतीला जागून सरकार दामोदररावाचा वारसा हक्क मान्य करील. मात्र संस्थान खालसा झाल्याचे वृत्त येताच प्रजेला खूप दुःख झाले.


हा जाहीरनामा राणी लक्ष्मीबाईला देण्यासाठी स्वतः मेजर एलिस राजवाड्यात आला, राणीला भेटला. राणी चिकाच्या पडद्याआड सगळे पाहत होती. मेजर एलिसने जाहीरनाम्याचा कागद कारभाऱ्याच्या हातात दिला. कारभाऱ्याने जाहीरनाम्याचे वाचन केले. त्यानंतर एलिसने राणीला आश्वासन दिले की, 'झांशी खालसा झाले असले तरी सरकार राणीला इतमामाप्रमाणे भरपूर तनखा देणार आहे.'

आश्वासन देऊन झाल्यानंतर मेजर एलिस जेव्हा जायला निघाला तेव्हा आत्तापर्यंत चूप बसलेली राणी लक्ष्मीबाई संतापाने म्हणाली, 'मैं मेरी झांशी नहीं दूँगी.'

संपूर्ण राजवाड्यात राणीचे हे तिखट शब्द पसरले. सगळा दरबार स्तब्ध झाला. राणीच्या मुखातून आलेले हे शब्द राणीच्या नावासह इतिहासात कायमचे कोरले गेले. अमर झाले. एका शूर स्त्रीच्या



Scanned with CamScanner



अस्मितेचे ते प्रतिक ठरले कारण या वाक्यात वेदना, स्वाभिमान आणि चेतना काठोकाठ भरली होती.

एलिसने आणखी एक काम केले. जनरल साहेबांनी राणी आणि तिच्या कुटुंबासाठी पाच हजार रुपयांचे मासिक पेन्शन दिले होते, त्याची वाच्यता केली. ते ऐकल्यावर राणी पुन्हा पडद्याआडून कडाडली. 'मला हे पेन्शन नको. मी ते घेणार नाही' असे बोलून ती आपल्या महालात निघून गेली.

एलिसने पहिली गोष्ट झांशी संस्थान बंदोबस्त करण्याची केली. दिवाणजींकडून सर्व चाव्या ताब्यात घेतल्या आणि शहरात इंग्रजी राज्य आल्याची दवंडी पिटवली.

डलहौसीने दिलेल्या आज्ञेप्रमाणे गंगाधररावांची खाजगी संपत्ती आणि जड-जवाहिर दत्तक पुत्र दामोदररावाच्या नावे करण्यात आले आणि ते राणीच्या ताब्यात देण्यात आले. तसेच झांशीच्या खजिन्यातून सहा लाख रुपये काढून इंग्रजांच्या खजिन्यात जमा करण्यात आले. दामोदरराव सज्ञान झाल्यावर ही रक्कम त्याला मिळणार होती. राणीने



Scanned with CamScanner

झांशीचा किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन केला. किल्ल्यात एक मोठे भुयार होते. ते हत्तीखान्याकडे आणि तिथून शहरातल्या महालात जात होते. राणीने हे भुयार बुजवले आणि निवडक सख्यांसोबत ती शहराच्या महालात राहण्यास गेली.

लक्ष्मीबाईने जाहीरनाम्याला विरोध केला नाही कारण तिला खात्री वाटत होती की संस्थान खालसा करण्याचा निर्णय फिरवला जाईल. या आशेवर तिने २२ एप्रिल १८५४ रोजी गव्हर्नर जनरलला एक विनंती अर्ज पाठवला. त्यात लिहिले की, गव्हर्नर जनरलने राणीचे म्हणणे ऐकून घ्यावे.

त्या सुमारास जॉन लॅन्ग नावाचा एक ब्रिटिश बॅरिस्टर हिंदुस्थानात आला होता. कायदेशीर सल्ला घेण्यासाठी त्याला झांशीला बोलावण्यात आले. त्याने सल्ला दिला की राणीने थेट लंडनच्या कंपनी सरकारच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडे अपील करावे.

त्याने राणीला एक निवेदन तयार करून दिले आणि तिने ते ८ जून १८५४ रोजी गव्हर्नर जनरलकडे पाठवले. परंतु या निवेदनात कोणतेही नवे मुद्दे नाहीत या कारणास्तव डलहौसीने हे निवेदन फेटाळून लावले.

राणीने काही नवे मुद्दे मांडून १९ जुलै १८५४ ला एक निवेदन गव्हर्नर जनरलकडे पाठवले परंतु या निवेदनाचाही काही उपयोग झाला नाही.

हिंदुस्थानातील कंपनी सरकार कशाला धूप घालत नाही हे लक्षात आल्यावर राणीने लंडनच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडे २१ डिसेंबर १८५४ रोजी नवे निवेदन पाठवले आणि त्यात कंपनी सरकारने घेतलेला निर्णय कसा चुकीचा बेकायदेशीर अनैतिक आणि अन्यायकारक आहे ते मांडले. मात्र कंपनी सरकारने झांशी संस्थानने वेळोवेळी केलेली मदत, मैत्री करार, कायदेशीरपणा या कशालाच किंमत दिली नाही



Scanned with CamScanner

आणि झांशी संस्थान खालसा करण्याचा निर्णय ठामपणे बजावला.

झांशीचा राज्यकारभार हाती घेताच कंपनी सरकारने गोहत्याबंदी उठवली तसेच दुकानातून गोमांस विक्री चाली केली हे निर्णय लोकांच्या धर्मभावना, श्रद्धा दुखावणारे होते. त्याचवेळी राणीचा अपमान करणाऱ्या काही गोष्टी केल्या. कंपनी सरकारने राणीला गंगाधररावांकडून देणगी म्हणून मिळालेली सगळी शेतजमीन, फळबागा, फुलबागा जप्त केल्या. दामोदररावांच्या मुंजीसाठी एक लाख रुपये देताना चार लोकांकडून हमीपत्र देण्याची अट घातली. राणीचे सगळे छोटे-मोठे मालकी हक्क, अधिकार काढून घेण्याचे, तिची प्रतिष्ठा कमी करण्याचे सतत प्रयत्न केले आणि राणीला अपमानीत करण्याची एकही संधी सोडली नाही.

नव्या राजवाड्यातील राणीचे आयुष्य अतिशय क्लेशदायक होते. तिथे होणारा रोजचा घोडेस्वारी, तलवारबाजी, मल्लखांब यांचा रियाझ बंद पडला होता कारण तिथे या सगळ्यांसाठी जागा नव्हती.

विनाकारण राज्य गमावल्यामुळे दुःख, अपमान आणि त्याच वेळेला आलेला असहाय्यपणा यामुळे राणीचे मन खूप विषन्न झाले होते आणि यातून आलेला इंग्रजांबद्दलचा राग, संताप, चीड आणि हतबलता याने मनामध्ये उद्रेक उडाला होता.

■



Scanned with CamScanner

# ७. १८५७चा स्वातंत्र्यसंग्राम

गव्हर्नर जनरल डलहौसीने इंग्रजी साम्राज्य अमर्याद असे वाढवले आणि त्यामुळे हिंदी जनतेत असंतोष पसरू लागला होता. असंतोषाची आग धुमसत असतानाच १८५६ मध्ये हिंदुस्थानचा कारभार सोडून तो विलायतेला रवाना झाला. थोड्याच दिवसांत डलहौसी विलायतेत मरण पावला पण हिंदुस्थानचे लोक त्याने केलेली लूट विसरले नाहीत. जनतेच्या मनात खदखदत असलेल्या संतापात काही तात्कालिक कारणांची भर पडून देश एक ज्वालामुखी बनला होता. या काळात लॉर्ड कॅनिंग याची हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली.

त्यावेळी सगळीकडे ख्रिश्चन मिशनऱ्यांचा सुळसुळाट झाला होता. त्यांचा धर्मप्रचार तसेच लोहमार्ग व तारायंत्रे ही आपला धर्म नष्ट करण्यासाठी आहेत अशी सर्व सैनिकांची समजूत होऊ लागली होती. १८५७च्या प्रारंभी अशा प्रकारे धर्माभिमाने इथली जनता इंग्रज सरकारविरुद्ध जळफळत होती. शंभर वर्षांपूर्वी इथे साम्राज्याचा पाया घालणारे प्लासीचे युद्ध इंग्रज लढले होते. प्लासीच्या युद्धानंतर शंभर वर्षांनी इंग्रजांचे राज्य बुडणार अशी भावना देशाच्या या टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत अटळ भविष्यवाणी म्हणून पसरली. हिंदुस्थानी



Scanned with CamScanner

सैनिकांच्या भावूक मनावर या भविष्यवाणीचा मोठा परिणाम झाला.

ज्यांची राज्ये अस्तंगत झाली होती असे राजे नबाब आणि त्यांचे सामर्थ्यशाली सहाय्यक हेही अस्वस्थ होते. ब्रह्मावर्तचे नानासाहेब पेशवे, सातारचे राजे तसेच झांशीच्या राणीला इथे तसेच विलायतेत न्याय मिळाला नव्हता हे सर्वांना माहीत होते त्यामुळे त्यांचे आणि अयोध्येच्या नबाबासारख्या इतरांचे मन इंग्रज सरकारविरुद्ध जळफळत होते.

नानासाहेब पेशवे ब्रह्मावर्त आणि कानपूर सोडून कधी बाहेर जात नसत. आता नाना दिल्ली-कराची-लखनौ इत्यादी ठिकाणच्या राजपुरुषांना भेटले आणि वरवर सहज भेटीगाठीचा देखावा करीत इंग्रजांना हिंदुस्थानातून हाकलून लावण्याच्या कटाची पावले टाकण्यास त्यांनी सुरुवात केली. नानासाहेबांचे वकील अझिमुल्ला आणि आणि सातारच्या राजांचे वकील रंगो बापूजी यांनी तर इंग्रजांविरुद्ध क्रांतीचा कट लंडनमध्ये गुप्तपणे आखला. स्वधर्माच्या प्रेमाने आणि फिरंग्यांच्या द्वेषाने जळणाऱ्या इथल्या हिंदी सैनिकांना या खंबीर राजपुरुषांमुळे उत्तम नेते लाभले होते आणि सत्तावन्नच्या प्रारंभी सर्व स्वातंत्र्य प्रेमी संग्रामासाठी आपली शस्त्रे परजू लागले होते.

सैनिकांच्या संतापाला आणखी एक तात्कालिक कारण घडले. ते म्हणजे नवीन काडतुसे. नवीन एनफील्ड रायफल डमडम, अंबाला आणि सियालकोटच्या सैनिकी ठाण्यामध्ये वापरली जाई. त्यात वापरलेल्या नव्या काडतुसांमध्ये गाईची आणि डुकराची चरबी वापरण्यात आली होती. ती काडतुसे दातांनी तोडावी लागत. त्यामुळे असल्या काडतुसांच्या स्पर्शाने आपली जात व धर्म बुडाला असे हिंदू व मुस्लिम सैनिकांना वाटणे साहजिक होते. याचवेळी जानेवारी १८५७ मध्ये डमडमच्या ठाण्यात स्पृश्य आणि अस्पृश्य शिपायांमध्ये पिण्याचे पाणी देण्याघेण्यावरून वादावादी झाली तेव्हा अस्पृश्य शिपाई स्पृश्य शिपायाला म्हणाला, 'आता एवढे नखरे करता पण तुम्हाला नव्या



Scanned with CamScanner

बंदुका दिल्या जातील तेव्हा कळेल. त्यांच्या काडसुतांना गायीची व डुकराची चरबी लावलेली आहे. मी त्या कारखान्यात काम करतो म्हणून मला माहीत. ती काडतुसे दातांनी तोडाल तेव्हा तुमचा धर्म शिल्लक राहणार आहे का?'

२६ फेब्रुवारी १८५७ रोजी बहराणपूरच्या शिपायांना नव्या बंदुका आणि नवी काडतुसे देण्यात आली तेव्हा त्यांनी या दोन्ही वस्तू घेण्यास सपशेल नकार दिला. त्यांना शिक्षा म्हणून त्यांच्या हातातील बंदुका हिसकावून घेऊन त्यांना बडतर्फ करण्यात आले. तिकडे बराकपूरमध्ये २९ मार्चला मंगल पांडेने इंग्रज अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडून उठाव केला. या कृत्याबद्दल पांडेवर ताबडतोब खटला भरून त्याला फाशी देण्यात आली. या पाठोपाठ ३ मे रोजी लखनौला पायदळामध्ये उठाव झाला.

अत्याचाराची वृत्ते मीरतच्या सैनिक छावणीवर येऊन धडकली आणि १० मे १८५७ला रविवारी सत्तावन्नच्या स्वातंत्र्य युद्धाने मीरत इथे पेट घेतला. पाचशे हिंदू आणि मुसलमान सैनिकांनी १० मेच्या सकाळी मीरत कारागृहावर हल्ला केला आणि बंदिस्त सैनिकांना सोडवून घेतले. विरोध करणाऱ्या कर्नल फिनिस याला ठार केले. इंग्लिश लोकांची घरेदारे उद्‌ध्वस्त केली आणि 'मारो फिरंगीको' अशा आरोळ्या ठोकीत अनेक इंग्रज अधिकाऱ्यांना यमसदनी धाडले. अशा प्रकारे मीरत इथे इंग्रजी सत्तेचे नामोनिशाण ठेवले नाही.

मीरत येथे बंडाने पेट घेताच मीरतच्या पाठोपाठ दिल्ली, बरेली, कानपूर, लखनौ, आग्रा, पाटणा, अलाहाबाद, बांदा, इंदूर या ठिकाणी स्वातंत्र्य संग्राम पेटला आणि इंग्रजांची राजवट समाप्त झाली. या संग्रामात राजे-महाराजे, जमीनदार, पंडित, मौलवी, विद्यार्थी, लेखनिक असे सर्व वर्गाचे लोक सामील झाले होते. खरं म्हणून बऱ्याच काळापासून लोकांच्या मनात इंग्रजांबद्दलचा संताप जमा होत आला



Scanned with CamScanner

होता आणि या उठावाने त्याने पेट घेतला.

४ जूनला कानपूरातही नानासाहेब पेशव्यांनी बंडाचा झेंडा फडकावला आणि त्याच दिवशी झांशीच्या इतिहासप्रसिद्ध रणांगणावर हिंदुस्थानी क्रांतिकारी सैनिकांनी स्वातंत्र्यासाठी फैरी झाडल्या. त्या अगोदर झांशीत एका बंगल्याला आग लावण्यात आली होती. अशा भयग्रस्त वातावरणात सर्व इंग्रज घाबरून गेले होते. झांशीच्या सैनिक विभागात 'स्टार फोर्ट' नावाचा किल्ला होता आणि दुसरा किल्ला गावात होता. भीतीच्या वातावरणामुळे बंगल्यातील सर्व युरोपियन कुटुंबांना गावातील किल्ल्यात हलवण्यात आले. रात्री सर्व अधिकारी तिथेच रहावयास जाऊ लागले.

इंग्रज राज्यकर्त्या अधिकाऱ्यांची ससेहोलपट चालू होती तेव्हा हाती असलेल्या सामर्थ्याने गॉर्डनने गावातला किल्ला सर्व बाजूंनी बंदिस्त केला. त्यात चोर मार्गांनी धान्य सामुग्रीही भरली आणि आतून क्रांतिकारकांवर गोळ्या झाडण्याचे प्रयत्न केले. एका प्रसंगात त्याचा शिरच्छेद झाला.

या हातघाईच्या युद्धात हिंदुस्थानचे क्रांतिकारी सैनिक अजिंक्य राहिले. शेवटी किल्ला लढवणे अशक्य आहे हे लक्षात येताच त्यातील नागरी युरोपियन अधिकारी हिंदी वेषात बाहेर पडले. मात्र त्यांचे हे सोंग जास्त काळ चालू शकले नाही आणि त्या सर्वांचा अंत झाला.

७ जूनला रिसालदार कालेखान आणि तहसीलदार महंमद हुसेन तसेच झांशीच्या क्रांतिकारकांनी किल्ल्यावर हल्ल्यावर हल्ले चढवले. किल्ल्याला क्रांतिकारकांनी सर्व बाजूंनी वेढले. आत अन्न सामुग्रीची वानवा झाली आणि बाहेरून येण्याची शक्यता नव्हती तेव्हा मेजर स्कीन आणि इतर इंग्रज अधिकाऱ्यांनी शरणागती पत्करली आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा ध्वज किल्ल्यावर फडकावला गेला.

झांशी अशाप्रकारे स्वतंत्र झाल्यावर सर्व क्रांतिकारी सैनिक



Scanned with CamScanner

झांशीच्या राणीच्या राजवाड्यावर गेले आणि राणीच्या नावाने मोठमोठ्याने हाका मारू लागले. त्या सगळ्यांना राणी लक्ष्मीबाईला भेटायचे होते. परंतु तिला या बेशिस्त शिपायांना सामोरे जायचे नव्हते. रिसालदार कालेखानने राणीला निरोप पाठवला आणि सांगितले, 'आम्ही झांशीतून फिरंग्यांचा नायनाट केला आहे. आता आम्ही दिल्लीला बादशहाकडे निघालो आहोत. आम्हाला खर्चासाठी तीन लाख रुपये द्यावेत.'

या निरोपाला राणीने नकारार्थी उत्तर धाडले. त्यावर कालेखानने उत्तर दिले की, 'पैसे द्या नाहीतर आम्ही राणी महाल लुटून नेऊ आणि मग जाळून टाकू.' त्याने झांशीच्या तख्तावर सदाशिवराव नेवाळकरांना बसवू अशी धमकीही दिली.

शेवटी लक्ष्मीबाईने निरूपायाने आपल्याजवळची चांदीची भांडी, स्वतःचे दागिने वगैरे एक लाख रुपये किंमतीचा ऐवज शिपायांच्या स्वाधीन केला.

राणी लक्ष्मीबाईने दिलेला ऐवज घेऊन क्रांतिकारक सैनिक दिल्लीच्या दिशेने निघून गेले. त्यावेळी दिल्लीच्या तख्तावर बहादूरशहा जफर होता. बादशाही अंमल सुरू झाला होता. सगळीकडून शिपाई दिल्लीकडे जात होते तसेच झांशीचे शिपाईही दिल्लीला निघाल होते. जाताना राणीच्या नावाची द्वाही फिरवीत होते. त्यांच्या तोंडची घोषणा अशी होती–

'खुल्फ खुदाका, मुल्क बादशहाका, अंमल रानी लक्ष्मीबाईका'

झांशीच्या नागरिकांना ही घोषणा मनापासून पसंत पडली. ती जशीच्या तशी त्यांनी उचलली. त्यानंतर झांशीचा परिसर 'खुल्फ खुदाका, मुल्क बादशहाका, अंमल रानी लक्ष्मीबाई का' या नादाने दुमदुमत राहिला.

■



Scanned with CamScanner

# ८. झांशीचा पाडाव


क्रांतिकारी सैनिक दिल्लीला निघून गेल्यानंतर झांशी संस्थान निर्णायकीच होते. झांशीमध्ये गोरा शिपाई उरला नव्हता. लक्ष्मीबाईच्या हातात कोणतीच सत्ता नव्हती. त्यासाठी काही तजवीज करणे तिला आवश्यक वाटते.

राणी लक्ष्मीबाईने ताबडतोब दुसऱ्या दिवशी झांशीतल्या अनेक जाणत्या कारभाऱ्यांना, अधिकाऱ्यांना, दरबारी लोकांना महालात बोलावून घेतले. राणीच्या आदेशाप्रमाणे सरदार, दरफदार, शासकीय अधिकारी, जहागीरदार, सावकार, सरपंच असे सगळेजण हजर झाले. त्यात दरबारचे प्रमुख सल्लागार गोपाळराव लघाटे, न्या. नाना भोपटकर, तहसीलदार अहसान अली, सेनापती जवाहरसिंग इत्यादी लोक होते. राणीचे वडील मोरोपंत आणि दिवाण लक्ष्मणराव हे देखील हजर होते.

निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत बैठकीत विचार करण्यात आला. अनुभवी मंडळींनी चर्चा केली. काही मुद्दे मांडले. झांशी जर अशीच निर्णायकी राहिली तर प्रजेचे हाल होणार होते आणि त्याचा फायदा



Scanned with CamScanner



आजूबाजूचे डाकू, छोटे छोटे राजेरजवाडे, जहागीरदार घेतील, झांशीचे लचके तोडण्यात कमी करणार नाहीत. यावर बैठकीत निर्णय घेण्यात आला की, अजून तरी सागर इथल्या इंग्रजांच्या पलटणीमधले शिपाई इंग्रज सरकारच्या विरोधात उठलेले नाहीत, तिथे शांतता आहे. तेव्हा सागरचा कमिशनर मेजर इर्कसनला राणीने पत्र पाठवावे.

मेजर इर्कसनला राणीने पहिले पत्र १२ जून १८५७ रोजी पाठवले आणि पाठोपाठ दोन दिवसानंतर १४ जूनला आणखी पत्र धाडले. त्यामध्ये झांशीमध्ये घडलेला घटनाक्रम तपशीलवार दिला.

मे. इर्कसनने राणीच्या दोन्ही पत्रांची दखल घेतली. प्राप्त स्थितीत राणी लक्ष्मीबाईवर विश्वास ठेवून तिला झांशीची अधिकारसूत्रे घ्यायला परवानगी देण्यावाचून इर्कसनसमोर दुसरा पर्याय नव्हता. २ जुलै १८५७ रोजी त्याने राणीला पत्र पाठवून आश्वासन दिले की सैन्य आणि इंग्रज अधिकारी लवकरच पाठवले जातील आणि तोपर्यंत राणीने ब्रिटिश सरकारतर्फे झांशी संस्थानचा कारभार पहावा.

इर्कसनने स्वतःच्या सहीनिशी राणीला जाहीरनामा धाडला आणि



Scanned with CamScanner

त्यात तमाम झांशीतील जनतेला आवाहन केले होते की, 'त्यांनी राणीचा हुकूम मान्य करावा. ब्रिटिश सरकारच्या नावे राणी लक्ष्मीबाई झांशीवर राज्य करेल. त्यांनी सरकारी महसूल तिच्याकडेच भरावा.'

इर्कसनच्या या आदेशाने राणीला आनंद आणि समाधान मिळाले. बरोबर तीन वर्षांपूर्वी (मार्च १८५४) झांशीचे राज्य खालसा केल्यानंतर राणीला अत्यंत अपमानकारक अटी मान्य करायला लावल्या होत्या आणि झांशीच्या किल्ल्यातील आपला राजमहलात यावे लागले होते. त्या सरकारने तिचे राज्य खालसा केले होते, त्याच सरकारने तिला परत सिंहासनी बसवले होते. त्यावेळी तिचे वय होते केवळ सत्तावीस.

राणी इतमामाने किल्ल्यातील महालात रहायला आली. किल्ल्यात राहणे सोयीचे होते, सुरक्षित होते. किल्ला हे ठिकाण राज सत्तेचे अधिष्ठान होते. त्यामुळे राणी लक्ष्मीबाई पुन्हा राजकर्ती झाली हे यातून जाहीर झाले.

राणीने किल्ल्यावर आल्या आल्या तिथली चांदीची भांडी गाळून टांक-साळीत त्याचे रुपये पाडून घेतले. इंग्रजांनी २२ तोफा निकामी केल्या होत्या. त्या दुरुस्त करून घेतल्या. तोफगोळ्यांची निर्मिती सुरू केली. पायदळ, घोडदळासाठी जाणत्या लोकांना बोलावून रुजू करून घेतले. झांशीतील तसेच शेजारच्या महीदपूर इथले क्रांतिकारी सैनिकांना सैन्यात सामील करून घेतले.

संरक्षणाची सिद्धता करण्याचा राणीचा हा निर्णय खूप महत्त्वाचा ठरला. राणीने राज्य कारभाराला सुरुवात केल्यानंतर काही दिवसांत लांबचा भाऊबंद सदाशिवराव नेवाळकर झांशीच्या गादीवर हक्क सांगून बंड करून उठला. त्याने दोन-तीनशे शिपायांसह झांशीजवळच्या कऱ्हेरा किल्ल्यावर चढाई करून तो ताब्यात घेतला आणि स्वतःसाठी महाराजा ही पदवी घेऊन त्याच अधिकाराने इतरांना आज्ञा सोडण्यास प्रारंभ केला.



Scanned with CamScanner

राणी लक्ष्मीबाईने सदाशिवरावाचे हे आव्हान मोठ्या हिमतीने पेलले. राणीच्या एक हजार सैनिकांनी किल्ल्यावर स्वारी करून किल्ला ताब्यात घेतला. सदाशिवराव पळून गेला होता. त्याला पकडून झांशीत बंदिवान म्हणून आणून ठेवले.

भाऊबंद सदाशिवरावाला नामोहरम करण्याच्या राणीच्या या पराक्रमाने इतरांवर चांगला वचक बसला. ठाकूर, बुंदेल्यांचे दंगे-धोपे बंद पडले.

हे संकट टळते ना टळते तो दुसऱ्या एका संकटाला राणीला सामोरे जावे लागले आणि ते होते ओर्छा संस्थानचा दिवाण नत्येखान याचे.

नत्थेखान वीस हजार सैन्यासह वैभवती नदीवर आला आणि त्याने राणी लक्ष्मीबाईला खलिता पाठवला. त्यात लिहिले, 'झांशीचा किल्ला ओर्छा राजाच्या मालकीचा आहे. तो तुम्ही आमच्या स्वाधीन करा. तुम्हाला इंग्रज देतात तेवढा तनखा उपजीविकेसाठी देऊ.'

स्वाभिमानी राणीला हे पसंत पडले नाही. खूप अपमानास्पद वाटले. तिने उलट कळवले की मी शिवरामभाऊंची सून आहे. तुमच्यासारख्यांना बायका बनवण्याचं सामर्थ्य माझ्यात आहे. याचा विचार करून युद्धास या.'

राणी लक्ष्मीबाई पाच हजार सैन्य जमवून स्वतः पुरुषी वेषात किल्ल्यावर आली. जवाहरसिंग कटिलेवाले याला सेनापतीपद दिले. राणी घोडेस्वारी, तलवारबाजीत तरबेज होती. मात्र युद्धाचा तिचा हा पहिला प्रसंग होता. गोळीबार सुरू होताच तिच्या गोलंदाजाने नत्थेखानचा हत्ती जायबंदी केला, तो पळू लागला. पाठोपाठ गोळीबाराच्या भडिमाराने त्याचे सैन्य पळू लागले. प्रचंड सैन्यासह आलेला नत्थेखानचा लक्ष्मीबाईच्या थोड्या सैन्याने नेट लावून पूर्ण पराभव केला. युद्धाचा सारा खर्च त्याने द्यावा, या अटीवर त्याची



Scanned with CamScanner

तहाची मागणी लक्ष्मीबाईनी मान्य केली.

नत्थेखानचा राणीने केलेला पूर्ण पराभव तिचा आत्मविश्वास वाढविण्यास कारणीभूत ठरला. तसेच फौजेचा तिच्या नेतृत्वावर विश्वास बसण्यात झाला.

या लढाईनंतर बुंदेलखंडात एक म्हण प्रचारात आली, 'नत्थेखान की मूंछे जट गयी, बाईसाहबकी छरौंसे' तसेच दनियाचा कवी कल्याणसिंह कुडरा यांनी तर तिच्या पराक्रमावर 'लक्ष्मीबाई रासो' नावाचे काव्य रचले.

झांशीमध्ये राणी लक्ष्मीबाई इंग्रजांच्या सांगण्यावरून राज्यकारभार करीत होती. त्याला चार महिने झाले होते. (सप्टेंबर १८५७). सदाशिवराव आणि नत्थेखान यांचा पराभव करून तिचे झांशी संस्थानावर वचक बसवला होता. कानपूर, बिठूर, लखनौ इथे ब्रिटिश सैनिकांनी धुमाकूळ घातला होता आणि नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, लखनौचा नबाब यांना पराभवाकडे रेटत होते. मात्र बुंदेलखंड अजूनही इंग्रजांच्या विरोधात होता. झांशीबद्दल इंग्रजांना खात्री वाटत नव्हती. राणी लक्ष्मीबाईबद्दल इंग्रजांच्या मनात संशय होता. मात्र तिच्या विषयी धाकही वाटत होता. कारण तिथल्या लोकांचा तिला मोठा पाठिंबा होता.. तिथल्या क्रांतिकारी सैनिकांनी गोऱ्यांची कत्तल करून झांशी संस्थान इंग्रजांपासून मोकळे केले होते हा इतिहास ताजा होता, ते विसरले नव्हते.

झांशी संस्थान खालसा करावे आणि राणी लक्ष्मीबाईला जिवंत पकडून आणावे, अशी आज्ञा गर्व्हनर जनरल लॉर्ड कॅनिंग याने मध्य हिंदुस्थानचा राजकीय प्रतिनिधी हॅमिल्टन यास दिली. सर ह्यूज रोज या कर्तबगार सेनानीची यासाठी नेमणूक करण्यात आली.

सर ह्यूज रोजला बुंदेलखंड सर करण्याच्या कामगिरीवर पाठवण्यात आले. त्याचा पहिला सामना राहतगढच्या नबाबाशी झाला आणि ही



Scanned with CamScanner

चकमक त्याने जिंकली. त्यानंतर गऱ्हकोटा, सनोदा, शाहगढ, मुरोवरा इथले किल्ले, गढ्या काबीज करून ह्यूज रोज पुढे निघाला. झांशीच्या पश्चिमेस वेत्रवती नदीजवळ असलेल्या बाणपूरच्या राजावर त्याने स्वारी केली आणि राजाचा पराभव केला. दरम्यान ८ मार्चला चंदेरीच्या किल्ल्यावर ब्रि. स्टुअर्टने हल्ला केला आणि दहा दिवसांत घनघोर युद्धाने ही मोहीम इंग्रजांनी फत्ते केली.

बाणपूरच्या राजाचा पराभव आणि चंदेरी किल्ल्याचा पाडाव केल्यानंतर इंग्रज सैन्य आता लवकरच झांशीवर येणार हे ओळखून लक्ष्मीबाईंनी झांशी लढवण्याची सिद्धता केली. कारण झांशी सोडून पेशव्यांकडे जावे तिला कमीपणाचे वाटले. झांशीत फितुरी होऊ नये म्हणून तिने सर्व सरदारांना बोलावले. रूप्याच्या ताटात बाण आणि बेलभंडार ठेवून सर्वांकडून झांशी शेवटपर्यंत लढविण्याची शपथ वदवून घेतली. झांशी मी लढविन, तुम्ही बाहेरून येऊन इंग्रजांशी लढावे असा निरोप तिने नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपे यांना धाडला.

झांशीच्या गोटात मोरोपंत तांबे, लालुबक्षी, बाणपूर आणि शहागडचे पराभूत राजे शूर ठाकूर, बुंदेलखंडाचे इतर सरदार आणि क्रांतिकारकांची मोठी संख्या होती. राणी लक्ष्मीबाई स्वतः झांशीच्या तटावर आणि लोकांच्या मोर्चाजवळ उभ्या राहून व्यवस्था पाहत होत्या. तोफांवर कुशल गोलंदाज नेमून देत होत्या, सर्व सैन्याला स्वातंत्र्यासाठी लढण्यास उत्स्फूर्त करीत होत्या. मंदिरातून विजयासाठी प्रार्थना चालल्या होत्या. झांशीतील स्त्रिया मागे नव्हत्या. दारूगोळ्याच्या कारखान्यात त्या काम करीत होत्या. नत्थेखान विरुद्ध झालेल्या लढाईचा अनुभव ताजा होता.

ह्यूज रोज २० मार्च १८५८ ला झांशी पासून चौदा मैलावरच्या चंचनपूरला पोचला. तिथेच त्याने सैन्याचा तळ ठोकला. झांशीचा पाडाव करणे कंपनी सरकारच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. २१ मार्चला



Scanned with CamScanner

सकाळी ह्यूज रोज प्रचंड सैन्यानिशी झांशीजवळ येऊन पोचला. आल्या आल्या एका टेकडीवर मनोरा उभारून तारायंत्र बसवले आणि शक्तिशाली दुर्बिणीची सोय केली. आता झांशी त्याच्या दृष्टीच्या टप्प्यात आली. त्याने वेगाने हालचाल करून रातोरात कामाक्षी टेकडी, जार पहाडी, जीवन सहाय पहाडी यांच्यावर कब्जा मिळवला आणि झांशीच्या किल्ल्यावर तोफांचा मारा करण्यास सुरुवात केली. राणी लक्ष्मीबाईची जय्यत तयारी होती. तिनेही त्याला जशास तसे उत्तर दिले.

पहिले तीन दिवस राणीची बाजू अभेद्य राहिली. युद्धाच्या पाचव्या दिवशी किल्ल्याच्या पश्चिम बाजूची तोफ इंग्रजांनी सूर्यास्ताला बंद पाडून किल्ल्यावर तोफांचा मारा केला. तटाची खिंडारे राणीने रातोरात बुजवून घेतली. लढाईच्या सातव्या दिवशी पहाटेपासून शंकर किल्ल्यावर इंग्रजांच्या तोफगोळ्यांनी मारा केला. रोजने इतर संस्थाने दोन-चार दिवसांत जिंकली होती. झांशी मात्र त्याच्या आत्मविश्वासाला डिवचत होती. त्यांनी खबऱ्याकडून कुठे भेद होतो का त्याची माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यात यश आले. शंकर किल्ल्यावरील मोठ्या विहिरीची नेमकी जागा कळली. संपूर्ण किल्ल्याला पाणी या विहिरीतून मिळत होते. तसेच तोफगोळे बनविण्याची जागा कळली. त्याने विहीर आणि तोफखाना नेमकेपणाने टिपला आणि राणीचे नीतिधैर्य कमी करण्याचा प्रयत्न केला. राणीकडून रात्रभर दुरुस्त्यांची कामे चालू राहिली. मात्र इंग्रज फौजांकडून सतत गोळीबार होत होता.

राणीने दिवाणासहीत ज्येष्ठांचे सल्ले घेतले आणि पाठीमागून रेटा देण्यासाठी फौज पाठवण्यासाठी पेशव्यांना पत्र पाठवले.

मार्चच्या २१ तारखेला तात्या टोपेंनी मोठी फौज घेऊन बेटवा नदी ओलांडली आणि ब्रिटिशांच्या फौजेच्या पाठीमागे तळ ठोकला.

ह्यूज रोज काळजीत पडला. कारण तात्या टोपे २२ हजार सैन्य



Scanned with CamScanner

घेऊन आला होता. ह्यूज रोजने शक्कल लढवली. आपल्या घोडदळाच्या दोन तुकड्या केल्या आणि डाव्या–उजव्या बाजूनी तो तात्याच्या सैन्यावर तुटून पडला. पायदळाने समोरून हल्ला केला. अशाप्रकारे तात्या टोपेला तिन्ही बाजूंनी घेरला. यामध्ये सैन्याची आघाडीची फळी बावरून पळून गेली. शेवटी सैन्याला वाचवण्यासाठी तात्याने पद्धतशीर माघार घेतली.

ह्यूज रोज विजयी होऊन दुसऱ्या दिवशी झांशीकडे वळला. तात्या टोपेचा पराभव झाल्यामुळे इंग्रजी फौज जोमात आली. शहराच्या तटबंदीला भगदाड पाडण्यात इंग्रजी यशस्वी झाले. राणीच्या सैन्याचे बळ इंग्रजी सैन्यापुढे टिकले नाही. राणीची फौज एका बाजूला लढण्यात गुंतलेली असताना दुसऱ्या बाजूने तटावर चढून इंग्रजी फौज शहरात उतरली आणि ओर्छा दरवाज्यातून ह्यूज रोज फौजेला घेऊन शहरात घुसला. फितुर दुलाजी सिंगने हे दरवाजे इंग्रज फौजेसाठी उघडून ठेवले होते.

झांशी शहराच्या रस्त्यात आता लढाई सुरू झाली. चार तासांच्या लढाईनंतर राणीचा राजमहाल इंग्रजांच्या हाती पडला. राणी लक्ष्मीबाई मात्र आदल्या रात्रीच राजमहाल सोडून गावातल्या किल्ल्यात गेली होती. किल्ल्यावर दुःखाचे सावट पसरले होते. राणीने किल्ल्याच्या तटावरून शहराकडे नजर टाकली. आपल्या आवडत्या झांशी शहराची दैना तिला पाहवेना. एका निश्चयाने ती घोड्यावर स्वार झाली आणि किल्ल्यावरून खाली उतरून शहरात आली. राणी गर्दीत घुसली आणि विजेच्या लोळासारखी गोऱ्यांवर तुटून पडली. तिच्याबरोबर रक्षणासाठी पंधराशे अफगाण शिबंदीचे शिपाई होते. तिचा आवेश, हिंमत, तिचे शौर्य, तिची तलवारबाजी आणि चेहऱ्यावरील उग्र संताप पाहून ह्यूज रोज ही थक्क होऊन गेला. गोरे शिपाई वाड्याच्या आडून पिस्तुले चालवित होते. त्यातली एखादी गोळी राणीला वर्मी लागू शकली



Scanned with CamScanner



असती. तेव्हा एक अनुभवी सरदार म्हणाला, 'राणी सायबा, बंदुकीच्या गोळीने मरणे रांड मरणे होय. आपण बाले किल्ल्यात जाऊन लढावे.'

राणी लक्ष्मीबाई बाले किल्ल्यात आली आणि सुन्न मनाने तिथे बसून राहिली. आपल्या आवडत्या शहराची विटंबना पाहून तिच्या डोळ्यांत पाणी आले. किल्ल्यात दारूगोळा होता तो पेटवून त्यात आत्मघात करण्याचा राणीचा विचार होता. आपला स्त्री देह जिवंत वा मृत शत्रूच्या हाती लागला तर शत्रू विटंबना करील त्यापेक्षा देह अग्नीत नष्ट करून टाकण्याचा तिचा विचार तिने दरबारी लोकांना सांगितला. त्यावर दरबारी तिला म्हणाले, 'किल्ल्यात राहणे सुरक्षित नाही. रात्री शहरातून बाहेर पडावे आणि पेशव्यांकडे काल्पीला जावे. पेशव्यांकडे भरपूर सैन्य आहे. तिथे पुढचे बेत ठरवता येतील. आत्महत्या करणे हे पाप आहे.'

राणीला दरबाऱ्यांचे म्हणणे पटले आणि ४ एप्रिलच्या मध्यरात्री लक्ष्मीबाई पांढऱ्या घोड्यावर स्वार होऊन किल्ल्यातून निघाली. तिने पाठीमागे रेशीम धोतराने बारा वर्षांच्या दत्तक मुलाला बांधले होते.



Scanned with CamScanner

उत्तरेकडच्या भांडेर दरवाज्यातून लक्ष्मीबाई आणि तिचे सैनिक बाहेर पडले. काशी, सुंदर आणि मुंदर या दासीही बरोबर होत्या. दरवाज्यावरील रक्षकाने विचारले तेव्हा ह्यूज रोज साहाय्यासाठी तेहरीचे सैन्य जात आहे असे उत्तर दिले. शहराबाहेर आल्यावर काल्पीच्या मार्गावर राणी व सर्वजण भरधाव वेगाने दौडत राहिले.

राणी लक्ष्मीबाईच्या या यशस्वी सुटकेने सर ह्यूज रोजला आश्चर्याचा धक्का बसला.

■



Scanned with CamScanner

# ९. काल्पीची झुंज

राणी लक्ष्मीबाई झांशीहून निघाली आणि दुसऱ्या दिवशी पहाटे झांशीपासून एकवीस मैलांवरच्या भांडेर गावी पोचली. सकाळची आन्हिके आणि फराळ आटोपून ती घोड्यावर स्वार झाली. पाठीशी छोटा दामोदर होता. ती निघणार एवढ्यात तिच्या मागावर आलेला लेफ्टनंट बौकर तिथे पोचला. ह्यूज रोजने त्याला पाठवला होता. तलवारबाजीत वाकबगार असलेल्या राणीने बौकरवर तलवारीचा जोरदार वार केला. त्याची मांडी निखळून पडायची ती केवळ पिस्तुलामुळे वाचली. या हल्ल्याने तो हबकून माघारी वळला आणि राणी काल्पीकडे वेगाने झेपावली आणि दिवसभर घोडदौड करून काल्पी शहराच्या वेशीवर पोचली. बौकरला जरी पिटाळलं तरी इंग्रज सैन्य आपल्या पाठोपाठ काल्पीला येईल हे तिला माहीत होतं. पुढचे धोरण, व्यूहरचना या विषयीची चर्चा नानासाहेबांचे बंधू रावसाहेब पेशवे, तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई यांच्यामध्ये झाली.

झाशीची व्यवस्था करून ह्यूज रोजने मोठा फौजफाटा घेऊन २५ एप्रिलला काल्पीकडे कूच केले. तोपर्यंत दिल्ली, कानपूर, बिठूर, लखनौ ही महत्त्वाची ठिकाणे इंग्रजांच्या ताब्यात आली होती. फक्त



Scanned with CamScanner



काल्पी बाकी होते. तिथे राणी लक्ष्मीबाई रावसाहेब, तात्या टोपे यांच्याशी झुंज देण्यासाठी साठ हजार शिपायांची फौज घेऊन रोज निघाला होता. ह्यूज रोज फौजेसह काल्पीवर हल्ला करण्यास येत आहे हे कळल्यावर त्याला काल्पीपासून ४२ मैलांवर असलेल्या कुंच गावी गाठायचे असे तिघांच्या चर्चेमध्ये नक्की ठरले.

कुंच गावाबाहेर लढाईस तोंड लागले. या ठाण्याच्या मदतीसाठी राणी लक्ष्मीबाई आणि रावसाहेब पेशवे आले. बांद्याचे नबाब, शहागडचे राजे आणि बाणापूरचे राजेही आले होते. पण त्यांच्यात सुसूत्रता नव्हती. सैन्यात शिस्तीचा अभाव होता. त्यामुळे ह्यूज रोजने जेव्हा आपले घोडदळ गावात घुसवले तेव्हा सैन्याची फळी घाबरली, सैन्य सैरा वैरा पळू लागले आणि आजूबाजूच्या जंगलात निघून गेले. युद्धाच्या या ऐनवेळी तात्या टोपे आपल्या आईवडिलांना भेटायला निघून गेला होता आणि राणी लक्ष्मीबाई कुंचमध्ये एकटी जिवाच्या आकांताने लढत राहिली. पेशव्यांनी दिलेले सैन्य लढण्यास कुचकामी होते. शिपायांवर अफू-गाजा व्यसनांचा विळखा होता. राणीजवळचे



Scanned with CamScanner

पाचशे अफगाण सैनिक निघून गेले तेव्हा ती हताश झाली आणि माघार घेतल्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. राणी काल्पीला परतली.

काल्पीला पोचताच कुंच गावच्या पराभवाची चर्चा नेत्यांमध्ये झाली. कुंच गावच्या पराभवाने राणी लक्ष्मीबाई खूप दुःखी झाली होती. रावबाहेस पेशव्यांना तिने स्पष्टपणे सांगितले की, इंग्रज सैन्यामध्ये शिस्त आहे तर आपल्या सैन्यात शिस्तीचा अभाव आहे. सैन्याची अशीच व्यवस्था राहिली तर जयाची आशा कधीच करायला नको. सैनिकांमध्ये शिस्तीबरोबर आत्मविश्वास, चैतन्य आणणे आवश्यक आहे. राणीने फौजेची रोज कवायत करून घ्यायची परवानगी घेतली आणि त्याप्रमाणे ती कामाला लागली.

रावसाहेब पेशव्यांनी सैन्याचे सेनापतीपद आपल्याकडे ठेवले, राणीला दिले नाही. राणीकडे स्वतःचे असे सैन्य नव्हते. तेव्हा रावसाहेबांनी अडीचशे घोडेस्वार तिला दिले आणि तिच्यावर यमुना नदीकाठची बाजू सांभाळण्याची जबाबदारी सोपवली.

हुशार ह्यूज रोजने नेहमीप्रमाणे कमकुवत बाजू कोणती याचा अभ्यास केला आणि १५ मे १८५८ रोजी काल्पीपासून सहा मैलावरच्या गलावली गावी तळ ठोकला. २२ मे रोजी पेशव्यांची फौज इंग्रज फौजेवर चालून गेली. सुरुवातीला इंग्रज सैन्याची दाणादाण उडाली पण पुढे इंग्रजांनी धनुष्यबाणाचा वर्षाव केला, त्याचवेळी तोफा बंदुकांच्या गोळ्यांचा जोरदार मारा केला. या माऱ्यापुढे सैन्याची वाताहात झाली.

रावसाहेब पेशवे आणि बांद्याचा नबाब पळून जाण्याचा विचार करू लागले. पण राणी लक्ष्मीबाईला हे पटले नाही. ती पुढे झाली आणि हातात तलवार परजीत घोड्यावर स्वार झाली. पेशव्यांनी दिलेल्या अडीचशे घोडेस्वरांना घेऊन तिने आघाडीकडे धाव घेतली. लाल वेषधारी तोफ-खान्याच्या साहाय्याने ह्यूज रोजच्या आघाडीवर आणि



Scanned with CamScanner

उजव्या बाजूला निकराचा हल्ला चढवला. या हल्ल्याने इंग्रज फौज मागे सरू लागली. राणी लक्ष्मीबाईच्या या पराक्रमाने पेशव्यांच्या फौजेत नवा जोम संचारला. इंग्रजी तोफा बंद पडल्या, इंग्रज गोलंदाज मरून पडू लागले, वाचलेले पळून जाऊ लागले. त्यांचे घोडदळही निकामी होऊ लागले. या पराभवाने दिग्मूढ झालेल्या ह्यूज रोजने दुसरा डाव टाकला. आपले राखीव उंटाचे दल त्याने रणांगणात आणले आणि सैन्यावर बाणांचा पाऊस पाडला. पेशव्यांच्या सैन्याला उंटावर बसलेल्या सैनिकांना गोळ्या झाडणे कठीण जात होते आणि तलवारीने लढताही येत नव्हते. अफूच्या प्रभावाखाली सुरुवातीला आवेशाने लढलेले सैन्य काही काळाने दमले. उंटावरून येणाऱ्या बाणांच्या माऱ्याने हतबल होऊन गेले. शेवटी सैन्याचा धीर सुटला आणि ते पळू लागले. राणीने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु तिला यश आले नाही.

राणीजवळचे कमी सैन्य, इतरांच्या हाताखालच्या सैन्याची बेशिस्त, अवसान घातकीपणा आणि अव्यवस्था आणि त्यांना लाभलेले कर्तृत्वहीन, दिशाहीन नेतृत्व यापुढे राणी हताश झाली. तिचा नाईलाज होऊन दुःखी मनाने ती काल्पीला परतली. बाकीचे नेते तिच्यापूर्वीच काल्पीत आले होते.

कुंच गावातील झुंज यशस्वी झाल्यानंतर ह्यूज रोज वेगाने पुढे निघाला. आता त्याचे लक्ष्य काल्पी शहर होतं.

शहराच्या वेशीवर येताच इंग्रज फौजांवर किल्ल्यावरून तोफगोळ्यांचा मारा झाला. त्याला उत्तर म्हणून इंग्रज फौजांच्या मोठ्याला तोफा किल्ल्यावर, शहरावर तोफगोळ्यांचा मारा करू लागल्या. पेशव्यांचे कमकुवत जिद्द हरवलेले सैन्य नाऊमेद झाले आणि इंग्रजांची सरशी होऊन त्यांचे सैन्य शहरात शिरले. दोन्ही सैन्यात चकमकी झडत होत्या. त्या संधीचा फायदा घेऊन रावसाहेब पेशवा,



Scanned with CamScanner

नबाब अलिबहादूर आणि राणी लक्ष्मीबाई शहराच्या बाहेर पडल्या. त्यांच्याबरोबर शिपाई सुद्धा बाहेर पडले.

२६ मेला ह्यूज रोजकडे बातमी आली की रावसाहेब, अलिबहादूर, तात्या टोपे आणि राणी लक्ष्मीबाई ग्वाल्हेरच्या रस्त्यावरून गोपाळपूरला गेले आहेत. या बातमीने तो घाबरला कारण त्याला खात्री होती की ते सर्वजण ग्वाल्हेरला जाणार आणि पुढची लढाई तिथे होणार.

झालेही तसेच. राणीसह सर्वजण गोपाळपूरला आले आणि सर्वानुमते ग्वाल्हेरला जाण्याचा निर्णय घेण्यात आला. इंग्रजांच्या घोडदौडीला लगाम घालण्याची ही शेवटची संधी होती आणि ती दवडू नये असे सर्वांचे मत पडले. ग्वाल्हेर घेण्याची योजना राणी लक्ष्मीबाईची होती आणि ते बळाने घेऊन टाकण्याचे सर्व नेत्यांनी ठरवले.

ग्वाल्हेरच्या जयाजीराव शिंद्यांकडून आपल्याला विरोध नाही असे रावसाहेब पेशव्यांना वाटले परंतु झाले उलटे. शिंद्यांच्या सेनेने पेशव्यांच्या फौजेवर तोफगोळे टाकायला सुरुवात केली. लक्ष्मीबाईंनी परिस्थिती जाणली. घोड्यावर स्वार होऊन शिंद्यांच्या फौजेवर त्यांनी चाल केली. इतर सैन्यही मदतीला आले. शिंद्यांच्या फौजेनी रणांगणातून पळ काढला. राणी लक्ष्मीबाईंनी ग्वाल्हेरचा राजवाडा हस्तगत केला आणि रावसाहेब पेशव्यांनी दिमाख्यात ग्वाल्हेरमध्ये प्रवेश केला. तात्या टोपेंनी ग्वाल्हेरचा किल्ला हस्तगत केला.

३ जून १८५८ रोजी राज दरबार भरवला गेला आणि पेशवे यांनी आपल्या नावाची द्वाही फिरवली.

पेशव्यांचे सैन्य विजयानंद साजरा करण्यात मशगुल झाले. इंग्रजांच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी मोठी सेना उभारणे वा युद्ध योजना आखणे त्यांना सुचले नाही. लक्ष्मीबाईला याचे फार दुःख झाले.

■



Scanned with CamScanner

# १०. ग्वाल्हेरच्या लढाईत राणीचा अंत

पेशव्यांच्या फौजेने ग्वाल्हेर हस्तगत केले ही बातमी ह्यूज रोजला कळली आणि त्याने सुट्टीवर जाण्याचा बेत रद्द केला. ६ जून १८५८ला त्याने आपली सेना ग्वाल्हेरकडे वळवली.

ह्यूज रोजने प्रथम ग्वाल्हेरच्या सैन्याची माहिती मिळवली. इकडे पेशवे आणि त्यांचे साथीदार सुस्त होते. विजय साजरा करण्यात रमले होते. इंग्रजांच्या फौजेच्या हालचाली तसेच युद्ध योजनाविषयी त्यांची काही आखणी वा युद्धनीती नव्हती.

१६ जून १८५८ या दिवशी ह्यूज रोजने ग्वाल्हेरपासून तीन मैलांवर असलेल्या आणि सुवर्णरेखा नदीने विलग झालेल्या एका गावाहून पेशव्यांच्या मोरार छावणीवर हल्ला करण्याचा आदेश आपल्या सैन्यास दिला. कारण या छावणीत पेशव्यांची फौज तळ ठोकून आहे, अशी बातमी टेहळणी पथकाने त्याला दिली होती. हल्ला होताच पेशव्यांच्या सैन्याची एक फळी तोफा टाकून पुलावरून गावात पळून गेली आणि दुसरी फळी रोज याच्या घोडदळाने अलग केली. ही फौज सैनिक विभागाच्या बाजूने पळाली.



Scanned with CamScanner

मोरार सैनिक विभागात इंग्रजांचा जय झाला तेव्हा पेशव्यांच्या गोटाला जाग आली. पण आता उशीर झाला होता. राणीने तसे स्पष्टपणे तात्या टोपेला सांगतले. ती म्हणाली, 'इंग्रजी सैन्य जवळ आले तरी आपल्या सैन्याची व्यवस्था नाही. श्रीमंतांच्या दुराग्रहामुळे आणि अकाली विजयरंग केल्यामुळे आपली मसलत फसली. तरी धीर सोडता कामा नये. मी माझे कर्तव्य करीन' असे म्हणून ग्वाल्हेरच्या पूर्व बाजूचे रक्षण करण्याचे काम राणीने आपल्या अंगावर घेतले.

१७ जूनला कोटाकी सराईच्या बाजूने इंग्रज फौज ब्रिगेडियर स्मिथच्या नेतृत्वाखाली पुढे आली. राणी लक्ष्मीबाई सैनिकी पोषाखात घोड्यावर स्वार झाली. स्मिथचे सैनिक पुढे येताच राणीच्या गोलंदाजांनी तोफांचा जबरदस्त मारा केला आणि इंग्रज सैन्य मागे हटले. लक्ष्मीबाई आघाडीवर राहून सैनिकांना प्रोत्साहन देत होती. त्यामुळे क्रांतिकारी सैनिक दुर्दम्य निश्चयाने लढले आणि ब्रि. स्मिथ याला आपल्या तळापर्यंत मागे हटावे लागले.

या माऱ्याने पिसाळलेल्या इंग्रजांनी ग्वाल्हेरवर सर्व बाजूंनी हल्ला करण्याचे ठरले. स्मिथकडे कोटाकी सराईपासून फुलबागेपर्यंत आघाडी उघडण्याचे काम देण्यात आले आणि ह्यूज रोजने कर्नल स्मिथ व कॅप्टन हेनेज यांच्या साहाय्याने मुरारकडून लक्ष्मीबाईच्या पायदळावर हल्ला चढवायचे ठरविले.

१८ जूनला ब्रि. स्मिथने अधिक उंच टेकड्यांवरून पेशव्यांची क्रांतिकारी फौजांच्या माऱ्याला तोंड देण्याचे ठरविले. डाव्या बाजूनी घोडदौड करून त्याला साहाय्य देण्याची जबाबदारी ह्यूज रोजने स्वतःकडे घेतली.

स्मिथ पुढे सरकणार याची राणी लक्ष्मीबाईला कल्पना होती. त्यादिवशी सकाळी नेहमीप्रमाणे ती पुरुषी वेष परिधान करून तयार झाली होती. इतक्यात स्मिथ कोटाकी सराईहून चाल करून येत असल्याची



Scanned with CamScanner

खबर तिच्या छावण्यात आली आणि अंतिम लढाईसाठी राणी लक्ष्मीबाई घोड्यावर स्वार झाली. तिने डोक्यास भरजरीचा चंदेरी फेटा आणि पायजमा घातला होता आणि अंगात तुमानी अंगरखा परिधान केला होता. राणीच्या गळ्यात मोत्याचा कंठा तळपत होता. सततच्या लढाईमुळे राणीचा नेहमीचा राजरत्न घोडा थकून गेला होता म्हणून शिंद्याच्या पागेमधला एक उमदा घोडा राणीसाठी आणला होता. राणीच्या हाती बिचवा, त्यांची पराक्रमी तलवार आणि ढाल होती. आणि भोवती विश्वासू सरदारांचे कडे होते. राणी लक्ष्मीबाईंच्या समवेत त्यांच्या आवडत्या दासी मुंदर आणि काशी याही होत्या. त्या पुरुषवेश धारण करून घोड्यावर स्वार होऊन अंतिम लढाईसाठी निघाल्या.

घोड्यावर स्वार होऊन राणी लक्ष्मीबाई वेगाने छावणीतून बाहेर पडली आणि शत्रूला सामोरी गेली. तिचा आवेश जबरदस्त होता. तलवारबाजीचा वेग आणि घाव स्तिमित करणारा होता. तलवारीचे सपासप वार करीत, समोर येणाऱ्या इंग्रज शिपायांना जखमी करीत होती. मारूनच टाकीत होती. तिचा तो मर्दानी आवेश पाहून तिच्या पलटणीमधले शिपाई पराकोटीच्या त्वेषाने लढू लागले. स्मिथ गांगरला, थोडा मागे सरकला. नंतर त्याने तोफखाना सुरू केला. राणीचे मकराणी स्वार स्मिथच्या फौजेवर तुटून पडले. तुंबळ युद्ध माजले. राणी स्मिथला मागे ढकलणार असे दिसू लागले असतानाच ब्रि. स्मिथच्या नव्या दमाची घोडेस्वारांची फलटण वेगाने शेजारच्या टेकडीवरून चालून आली तर पाठी मागून दुसरी तुकडी चालून आली. मागून पुढून चालून आलेल्या या फौजेमुळे राणीच्या दोनशे स्वारांचा निभाव लागला नाही, तिची फळी विस्कळीत झाली. इथे थांबण्यात अर्थ नाही हे राणीने ओळखले आणि तिने आपला घोडा बाहेर काढला. तिच्या पाठोपाठ निवडक स्वार सुद्धा बाहेर पडले. तिच्या एकनिष्ठ सेविका मुंदर आणि

काशीही बरोबर होत्या, तर रामचंद्रराव देशमुख, दामोदररावांना घेऊन निघाले होते.

एकाएकी 'बाईसाहेब मेलो, मेलो' असा आक्रोश त्यांच्या कानावर पडला आणि त्यांनी वळून मागे पाहिले. त्यांच्या मुंदर दासीला एका इंग्रज सैनिकाने गोळी मारून ठार केले होते. संतापाच्या भरात राणीने त्या गोऱ्या सैनिकावर वार करून त्याला आडवा केला. एका स्वाराला मुंदरच्या देहाची नीट काळजी घेण्यास सांगून त्या पुढे निघाल्या.

इतक्यात फुलबागेचा एक ओढा त्यांच्या मार्गात आला. त्याच्या रूपाने दुर्दैव त्यांच्या आड आले. ओढा ओलांडण्यासाठी घोड्याला त्यांनी टाच मारली. घोडा अडला, तो गरगर फिरतच राहिला. राणीसाहेबांनी त्याला पिटाळण्याचा खूप प्रयत्न केला पण घोडा अडलाच. मागून इंग्रज स्वार आले. राणी त्यांच्यावर तुटून पडल्या. अकस्मात एका स्वाराने मागून वार केला आणि त्यांचे उजव्या बाजूचे मस्तक घायाळ झाले. त्यांचा उजवा डोळाही बाहेर येऊन लोंबू लागला. पण त्याही स्थितीत त्यांनी हातातील तलवारीने गोऱ्या सैनिकाला यमसदनास पाठवले. त्या घोड्यावरून खाली कोसळल्या. पुरुष वेशात असल्यामुळे राणी लक्ष्मीबाई इंग्रज स्वारास ओळखता आल्या नाहीत. त्या पडताच तो सैनिक निघून गेला.

आपला अंतिम काळ जवळ आला आहे असे पाहून राणीने आपला एकनिष्ठ सेवक रामचंद्रराव देशमुखास जवळ बोलावले. रामचंद्ररावांनी त्यांना मोठ्या प्रयत्नाने रणांगणाजवळ असलेल्या बाबा गंगादास यांच्या मठात नेले. त्यांनी त्यांच्या मुखात गंगाजल घातले. लक्ष्मीबाईंनी आपल्या मुलाची आठवण काढली. रामचंद्ररावांनी दामोदररावास पुढे केले. राणीने त्याच्या मुखावरून प्रेमाने हात फिरवून त्याची काळजी घेण्यास सांगितले. आश्वासन मिळताच त्यांनी शेवटचा श्वास घेतला.



Scanned with CamScanner



राणी लक्ष्मीबाईची अशी इच्छा होती की आपला देह जिवंत वा मृत इंग्रजांच्या हाती लागू नये. तसे वचन त्यांनी विश्वासू साथीदारांकडून घेतले होते. राणीला दिलेले वचन खरे करून दाखवण्याची वेळ आता आली होती. अंधार पडताच त्यांच्या अंतिम इच्छेनुसार रामचंद्ररावांनी गवताच्या गंजीवर राणीचा देह ठेवला आणि त्याला भडाग्नी दिला.

झांशीची राणी लक्ष्मीबाईने १८ जून १८५८ला रणांगणावर लढता लढता देह ठेवला आणि अमर झाली. त्या ठिकाणी असलेली राणीची समाधी आजही त्याची साक्ष आणि अनेकांना प्रेरणा देत उभी आहे.

■




Scanned with CamScanner

**ई साहित्यवर श्री अशोक बेंडखळे यांची या पूर्वीची पुस्तके**






अशोक बेंडखळे

राजमाता जिजाई या शिवाजी राजांच्या माता, त्यांच्या मनात स्वराज्याचा अंकुर रूजवणाऱ्या आणि त्यांना हिंदवी राज्याची प्रेरणा देणाऱ्या. जिजाईना बालपणी मराठी सरदार परकीयांची वेठबिगारी करतायेत हे आपल्या बंधुंकडून कळले आणि त्यांच्या मनात स्वराज्याचा विचार पक्का झाला. त्यांनी राजांवर उत्तम संस्कार केले. मर्दानी कलांमध्ये पारंगत केले. पुण्याचा कारभार पाहताना शिवबांना कारभाराची तंत्र-मंत्र शिकवली. शिवाजी राजे मोहिमांवर जात तेव्हा जिजामाता कारभाराकडे लक्ष देत. राजांचा राज्याभिषेक झाला आणि आपला पराक्रमी पुत्र लोकांचा राजा झाला हे पाहून त्या कृतार्थ झाल्या. एक माता मनात आणले तर काय करू शकते त्याचे जिजामाता हे ज्वलंत उदाहरण आहे.

Scanned with CamScanner